७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १० मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## कोल्हापुरात 'मस्साजोग' प्रकरणाची पुनरावृत्ती?

कोल्हापूर (दै. संध्या) : भुदरगड तालुक्यातील पाटगावचे माजी सरपंच आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्य महेश दिनकर पिळणकर (वय ५२) हे गेल्या दोन महिन्यांपासून बेपत्ता असल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तपासादरम्यान बेवारस दुचाकी आणि जंगलात काही जळालेल्या अस्थी सापडल्याने या प्रकरणाचे गूढ आणखी वाढले आहे. पोलिसांचा तपास अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचा आरोप करत संतप्त पिळणकर कुटुंबीय आणि सामाजिक संघटनांनी आज कोल्हापुरात तीव्र निदर्शने केली. महेश पिळणकर हे ७ जानेवारी २०२६ रोजी रात्री आठच्या सुमारास जेवण करण्यासाठी घरातून बाहेर पडले, मात्र ते पुन्हा परतलेच नाहीत. पोलिसांच्या शोधमोहिमेदरम्यान पाटगावलगतच्या 'कुलकर्णी' नावाच्या शेताजवळ त्यांची दुचाकी बेवारस स्थितीत आढळून आली. यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे, दुचाकी सापडलेल्या ठिकाणापासून काही अंतरावरच जंगलात जळालेल्या अवस्थेत काही हाडांचे अवशेष (अस्थी) सापडले आहेत.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३०६ कोटींचा निधी

नाशिक (दै. संध्या) : नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकारने तब्बल 306 कोटींचा निधी मंजूर केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज सोमवारी दिली. यावेळी त्यांनी नाशिकमधील रिंगरोड, मुख्य रस्त्यांची दुरुस्ती, भव्य वाहनतळ, भाविकांसाठी तात्पुरती निवारागृहे (साधुग्राम) आणि मिसिंग लिंक रोड यासारख्या प्रकल्पांना केंद्र सरकारकडून 100 टक्के अर्थसहाय्य मिळणार असल्याचेही सांगितले. छगन भुजबळ यांनी सांगितले की, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा 2026-27 हा धार्मिक सोहळा नाशिकच्या सर्वांगीण विकासाची मोठी संधी आहे, हा दूरदृष्टिकोन ठेवून आपण केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. केंद्र सरकारच्या 'भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष अर्थसहाय्य योजने'अंतर्गत 'नाशिक कुंभमेळा 2026-27' साठी मी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी 306 कोटींच्या प्रकल्पांना केंद्र सरकारने निधी मंजूर केला आहे.

#### उद्धव ठाकरेंना विधान परिषदेत पाठवा

मुंबई (दै. संध्या) : शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेत असावे, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व अत्यंत चांगल्या पद्धतीने केले असून संकटकाळातही त्यांनी राज्याची जबाबदारी सक्षमपणे सांभाळली, असे राऊत म्हणाले. अशा अनुभवी नेत्याने विधान परिषदेत असणे हे महाविकास आघाडीसाठी सकारात्मक संकेत देणारे ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या उपस्थितीमुळे आघाडीतील आमदारांना बळ मिळेल आणि राजकीय पातळीवर आत्मविश्वास वाढेल, असेही राऊत यांनी सांगितले. विधान परिषदेच्या जागांवरून महाविकास आघाडीत काही प्रमाणात राजकीय हालचाली सुरू असल्याचे संकेतही राऊत यांनी दिले. आमचे 20 आमदार असून महाविकास आघाडीत आम्ही सर्वात मोठा पक्ष आहोत, असे सांगताना त्यांनी एक उदाहरणही दिले. 20 आमदार असूनही आम्ही राज्यसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिली होती, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आघाडीमध्ये समन्वय राखत निर्णय घेतले जातात, असेही त्यांनी सूचित केले. उद्धव ठाकरे विधान परिषदेत आल्यास त्याचा फायदा संपूर्ण आघाडीला होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

#### आगीत चार घरे जळून खाक

आंबेठाण (दै. संध्या) :गोनवडी-पिंपरी खुर्द (ता. खेड) येथील आदिवासी ठाकर समाजाची वस्ती असणाऱ्या भांगरे वस्तीवर चार घरांना अचानक लागलेल्या आगीत ही घरे संपूर्ण जळून राख झाली आहेत. अंगावरच्या कपड्यांव्यतिरिक्त या कुटुंबाकडे काहीही शिल्लक राहिलेले नाही. अशी दुर्दैवी वेळ या आदिवासी ठाकर बांधवांवर आली आहे. सुदैवाने या घरातील लोक कामासाठी बाहेर असल्याने यात जीवितहानी घडली नाही. गावातील नागरिकांनी तात्काळ मदत म्हणून वर्गणी काढत २५ हजार रुपये रोख आणि काही किराणा स्वरूपात मदत या कुटुंबांना केली आहे.

# ‘बॉण्ड’च्या माध्यमातून शहरांच्या विकासाला निधीचे बळ

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये नाशिक महापालिकेच्या ग्रीन बॉण्डचे लिस्टिंग**

मुंबई (दै. संध्या)



महानगरपालिकांना आपल्या विविध विकास कामांसाठी भांडवली बाजारात बॉण्ड जारी करून निधी उभारता येतो. नाशिक महापालिकेप्रमाणे ‘इनोव्हेटिव्ह फंड’ निर्माण करून विकासाला निश्चितच निधीचे बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बीकेसी येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये नाशिक महापालिकेच्या ग्रीन बॉण्डचे लिस्टिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते ‘रिंगिंग बेल’ वाजवून करण्यात आले.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर श्रीमती हिमगौरी आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चौहान, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, नाशिक कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग, महानगरपालिका आयुक्त श्रीमती मनीषा खत्री आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक महानगरपालिकेने एकाच आर्थिक वर्षात प्रथम खाजगी प्लेसमेंट आणि आता सार्वजनिकरित्या असे दोन्ही म्युनिसिपल बॉण्ड जारी करून या महापालिकेने भांडवली बाजारात प्रवेश केला आहे. भांडवली बाजाराच्या माध्यमातून महापालिकांनी निधी उभा करून लोकोपयोगी कामे केली पाहिजेत. यासाठी केंद्र शासनाने योजनादेखील घोषित केली आहे. पहिल्या टप्प्यात २०० कोटी रुपयांपर्यंतचे बॉण्ड्स काढण्याकरिता केंद्राने मान्यता दिली होती. याचे यश बघता केंद्रीय अर्थसंकल्पात या बॉण्डची मर्यादा १ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याकरिता देण्यात येणारे प्रोत्साहन मूल्यदेखील २०० कोटी रुपयांपर्यंत करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी नाशिक महानगरक्षेत्रात जवळपास २५ हजार कोटींची विकासाची कामे सुरू करण्यात आली आहेत. कुंभमेळ्यासाठी करण्यात येणाऱ्या विकास कामांमुळे निर्माण होणारी व्यवस्था कुंभ साठीच नाही, तर नाशिक शहर विकसित महानगरांच्या श्रेणीमध्ये आणण्यास कारणीभूत ठरणार आहे. यामुळे पुढील काळात नाशिक हे गुंतवणुकीचे चुंबक म्हणून उदयास येणार आहे, असा आशावादही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

नाशिक महापालिकेने या दोन्ही टप्प्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. केंद्र शासनाच्या प्रोत्साहन मूल्य आणि अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून नाशिक महापालिकेला बिनव्याजी पैसे मिळणार आहेत. या बॉण्डच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीद्वारे नाशिक महापालिका सार्वजनिक हिताचे पाणीपुरवठा संबंधित प्रकल्प पूर्ण करणार आहे. यामुळे पाण्याची गळती ४७ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत कमी होणार आहे. शहरी विकासातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या बॉण्डचा उपयोग होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्यातील छोट्या महापालिकांमधील विकास कामे करण्यासाठी एकत्रितपणे १ हजार कोटी रुपयांचे अशाच प्रकारचे बॉण्ड भांडवली बाजारात काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून महापालिकांनाही केंद्र शासनाच्या या योजनांचा लाभ मिळेल. नाशिक महापालिकेने अशाच पद्धतीने इनोव्हेटिव्ह फंडच्या माध्यमातून गुणात्मकदृष्ट्या शहराचा विकास करावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान नॅशनल स्टॉक्स एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चौहान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नाशिक महापालिकेच्या महानगर आयुक्त मनीषा खत्री यांनी बॉण्ड विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी सोनटक्के यांनी केले कार्यक्रमाला नाशिक महापालिकेतील लोकप्रतिनिधी, तथा अधिकारी उपस्थित होते.

**बॉण्डच्या निधीतून होणारी विकास कामे**

बॉण्डमधून उभारलेला निधीचा वापर विविध पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी होणार आहे. यामध्ये मुकणे धरण पंपिंग स्टेशन येथे क्षमता वाढविणे, विल्होळी येथे नविन जलशुद्धीकरण केंद्र, विल्होळी नवीन जलशुद्धीकरण केंद्र ते साधुग्रामपर्यंत मुख्य गुरुत्व वाहिनी टाकणे आदींचा समावेश आहे. प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे कुंभमेळ्याच्या काळात तसेच त्यानंतरही नाशिक शहराला स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे आहे.

## बोर्डाच्या परीक्षेसाठी AI चा वापर करून शिक्षकांनीच पुरवल्या कॉपी

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षेदरम्यान एआय तंत्रज्ञानाचा गैरवापर करून कॉपी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात सहभागी असल्याचे आढळल्यानंतर राज्यातील तब्बल ८१ शिक्षकांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षेदरम्यान काही ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ताचा वापर करून उत्तरं मिळवली जात होती. यासाठी विशेषतः ChatGPT सारख्या साधनांचा वापर करून कॉपी केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात बीड जिल्ह्यात सर्वाधिक कारवाई करण्यात आली. बीडमधील





■ तब्बल इतके शिक्षक निलंबित

चौसाळा परीक्षा केंद्रात अनेक शिक्षक यात सहभागी असल्याचे तपासात उघड झाले. काही ठिकाणी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संगनमत केले होते. तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्तरं पुरवली जात होती. मंडळाने केलेल्या प्राथमिक चौकशीनंतर संबंधित शिक्षकांना निलंबित करण्यात आले असून या प्रकरणात पुढील शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे.

## महिलांच्या रक्षणासाठी सरकारी तिजोरी खुली; ‘आकृतीबंध’ गेम चेंजर ठरणार?

मुंबई (दै. संध्या)

“राज्यातील महिलांच्या न्याय आणि हक्कासाठी लढणाऱ्या महिला आयोगाला निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही,” अशी ग्वाही महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विधानसभेत दिली. केवळ आश्वासनेच नव्हे, तर यावर्षी आयोगासाठी तब्बल १८ कोटी ३५ लाख रुपयांची घसघशीत तरतूद करून सरकारने महिला सुरक्षेबाबतचा आपला इरादा स्पष्ट केला आहे. या निर्णयामुळे महिला आयोगाच्या सक्षमीकरणाला मोठी गती मिळण्याची चिन्हे आहेत.



विधानसभेत सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना राज्यमंत्र्यांनी आयोगाच्या भविष्यातील वाटचालीचे महत्त्वपूर्ण संकेत दिले. सध्या आयोगामध्ये एकही पद रिक्त नसून, कामाचा व्याप पाहता नवीन ‘आकृतीबंध आराखडा’ थेट मंत्रिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. हा आराखडा मंजूर होताच आयोगात मोठ्या प्रमाणावर कर्मचारी वाढ केली जाणार आहे, ज्यामुळे तक्रारींचे निवारण अधिक वेगाने होऊ शकेल. मात्र, सद्यस्थितीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा कोणताही विचार नसल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत नमूद केले.

केवळ मनुष्यबळच नाही, तर तंत्रज्ञानाच्या बाबतीतही आयोगाने मोठी झेप घेतली आहे.

८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून लॉंच करण्यात आलेल्या नवीन पोर्टलमुळे सायबर गुन्ह्यांच्या कचाट्यात सापडलेल्या महिलांना मोठा आधार मिळणार आहे.


“सायबर गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी हे पोर्टल एक प्रभावी शस्त्र ठरेल,” असा विश्वास बोर्डीकर यांनी व्यक्त केला. निधीचा ओघ आणि नव्या तंत्रज्ञानाची जोड यांमुळे आता महिला आयोगाची ताकद दुप्पट होणार असून, विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सरकारने आकडेवारीनिशी उत्तर दिले आहे.

## आमदार प्रकाश सोळंकेंनी मांडली ग्रामीण भागातील व्यथा

*लग्नाळू तरुणांचा प्रश्न विधानसभेत गाजला : सरकारची सकारात्मक ग्वाही*

मुंबई (दै. संध्या)

जागतिक महिला दिनानिमित्त विधानसभेत एकीकडे महिलांच्या सक्षमीकरणावर चर्चा सुरू असतानाच, दुसरीकडे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील एका अत्यंत ज्वलंत आणि गंभीर सामाजिक समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधले. "ग्रामीण भागातील शेती करणाऱ्या तरुणांना लग्नासाठी मुली मिळेनाशा झाल्या असून, लग्नासाठी मुलांनाच हुंडा द्यावा लागत आहे," अशा शब्दांत सोळंके यांनी ग्रामीण तरुणांची व्यथा मांडली. या परिस्थितीमुळे फसवणुकीचे मोठे रॅकेट सक्रिय झाले असून, सरकार यावर काय उपाययोजना करणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. लक्षवेधी सूचनेद्वारे त्यांनी



ग्रामीण समाजात निर्माण होत असलेल्या या गंभीर सामाजिक प्रश्नावर सरकारने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली. लक्षवेधी सूचनेदरम्यान बोलताना प्रकाश सोळंके म्हणाले की, "मी ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करतो आणि तिथली परिस्थिती अत्यंत भयावह आहे. आज प्रत्येक लहान-मोठ्या खेडेगावात २५ ते ३० वयोगटातील किमान ५० ते १०० तरुण असे आहेत, ज्यांचे वय उलटून गेले तरी लग्न झालेले नाही. यामागील मुख्य कारण म्हणजे हे तरुण शेतीचा व्यवसाय करतात. आज ग्रामीण भागात शेती करणाऱ्या मुलाला मुलगी द्यायला कुणीही तयार नाही, ही वस्तुस्थिती आहे."

लग्नाच्या या टंचाईमुळे ग्रामीण भागात एक नवी आणि घातक प्रथा रूढ होत असल्याचे सोळंके यांनी निदर्शनास आणून दिले. ते म्हणाले, "पूर्वी मुलींकडून हुंडा घेतला जात असे, पण आता परिस्थिती उलटी झाली आहे. मुलाला लग्न करण्यासाठी मुलीच्या कुटुंबाला हुंडा द्यावा लागत आहे. या हतबलतेचा फायदा घेऊन फसवणुकीचे मोठे जाळे विणले जात आहे. 'बोगस मुली' आणून त्यांचे विवाह लावून दिले जातात. अडीच-तीन लाख रुपये लुटले. धक्कादायक म्हणजे, एकाच मुलीचे चार-चार विवाह लावून तरुणांना लुटण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत."

## उद्धव ठाकरेंना मदत हवी असल्यास त्यांनी एकनाथ शिंदेंशी संपर्क करावा

मुंबई (दै. संध्या)

सध्या राज्याच्या राजकारणात विधान परिषदेच्या सदस्यत्वावरून मोठी चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा विधान परिषद सदस्य म्हणून असलेला कार्यकाळ 13 मे रोजी संपणार आहे. त्यामुळे ते पुन्हा विधान परिषदेत येणार का, याबाबत राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत. ठाकरे गटाकडून मात्र उद्धव ठाकरे यांनाच पुन्हा उमेदवारी मिळावी, अशी मागणी जोर धरताना दिसत आहे. अशा परिस्थितीत शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी या मुद्द्यावरून ठाकरे यांच्यावर टीका करत त्यांना एक उपरोधिक सल्ला दिला आहे. नरेश म्हस्के यांनी पत्रकारांशी



बोलताना उद्धव ठाकरेंच्या आमदारकीच्या विषयावर भाष्य केले. त्यांनी सांगितले की, दिल्लीसमोर नाराजी व्यक्त करण्यापेक्षा उद्धव ठाकरे यांनी एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन करावा. शिंदे हे मोठ्या मनाचे नेते आहेत आणि जर त्यांना फोन केला तर ते तुमच्या पाठीशी उभे राहतील, असा टोला त्यांनी लगावला. उद्धव ठाकरेंनी दिल्लीकडे धाव घेण्यापेक्षा शिंदेंशी संवाद साधावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

## बड्या नेत्यांकडून व्ही. के. सिंगला संरक्षण : रोहित पवारांचा मोठा दावा

मुंबई (दै. संध्या)

■ अखिलेश यादवांची भेट घेत संसदेत आवाज उठवण्याची मागणी

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणाला आता राजकीय वळण लागले असून, आमदार रोहित पवार यांनी याप्रकरणी खळबळजनक दावे केले आहेत. "अजितदादांचे विमान पडले की पाडले गेले? हा आमचा साधा प्रश्न आहे," असे विचारत त्यांनी थेट 'व्हीएसआर' कंपनीचे मालक व्ही. के. सिंग आणि राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल यांना लक्ष्य केले आहे. बड्या नेत्यांकडून व्ही. के. सिंगला संरक्षण असल्याचा दावा रोहित पवारांनी केला. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी दिल्लीत समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांची भेट घेऊन हा मुद्दा संसदेत उपस्थित करण्याची मागणी केली. पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार यांनी तांत्रिक बाबींवर बोट ठेवले. ते म्हणाले, "अपघाताच्या दिवशी दृष्यमानता ५ हजारच्या खाली असताना कॅप्टन कपूर यांनी व्ही. के. सिंग यांना फोन केला होता. 'व्हिजिबिलिटी खराब आहे, मी उड्डाण करू शकत नाही' असे वैमानिकाने स्पष्ट सांगितले होते. मात्र, त्यावर व्ही. के. सिंग यांनी 'तू टेकऑफ कर, बाकी नंतर पाहून घेतो' असा आदेश दिला.



सीआयडीने व्ही. के. सिंग यांचे कॉल रेकॉर्ड्स तपासले, तर हे संभाषण समोर येईल." वैमानिक कपूर यांच्याबद्दल बोलताना रोहित पवार म्हणाले की, "कपूर पूर्वी मद्यप्राशन करायचा याचे पुरावे आम्ही दिले आहेत. मात्र, आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार, अजितदादांचे विमान उडवत असताना त्याच्या रक्तात दारू, ड्रग्ज किंवा विष आढळलेले नाही. मग जर तो शुद्धीवर होता आणि व्हिजिबिलिटी कमी होती, तर त्याने उड्डाणाचे धाडस का केले? त्याच्यावर कुणाचा दबाव होता का? याच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. व्ही. के. सिंग स्वतःहून पुढे येऊन मीडियासमोर काही सांगत असेल, तर त्याला पुराव्यानिशी प्रत्युत्तर देऊ, असे रोहित पवार म्हणाले." व्ही. के. सिंग यांना जाणीवपूर्वक वाचवले जात असल्याचा आरोप करत रोहित पवार यांनी 'राजस्थान कनेक्शन' उघड केले. "व्ही. के. सिंगचा मुलगा रोहित सिंग याच्या लग्नात कुणीही जाऊ शकतो, हे मी समजू शकतो. पण आज जे सत्तेत आहेत, ते लोक रोहित सिंगच्या लग्नात गेले असतील, तिथे लग्नात अहुजा नावाचा सिंगर गाणे गात असताना प्रफुल पटेल तर होतेच, त्याचबरोबर त्यांचा मित्र एस. एन. शर्मा हा देखील त्या लग्नाला होता. यासोबतच अनेक मोठमोठे नेते देखील होते.

मी प्रफुल पटेलांना विनंती केलीये की, तुम्ही जर अजितदादांच्या जवळचे असाल, आणि तुम्ही त्या लग्नाला होताच, तर त्या लग्नात आणखी कोण होते? त्यांनी लोकांना समोर येऊन सांगा. लग्नात असणारी लोकं पॉवरफुल आहेत. ही लोकं रोहित सिंगच्या लग्नात जात असतील, तर १०० टक्के कुठे ना कुठे व्ही. के. सिंग, रोहित सिंग आणि व्हीएसआरला याच मोठ्या नेत्यांकडून वाचवले जात असल्याचे सिद्ध होते," असा दावा रोहित पवारांनी केला.

# संपादकीय

## भविष्यवेधी संकल्प

कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत 'समृद्ध महाराष्ट्राचा भविष्यवेधी अर्थसंकल्प' सादर केला. नव्या पिढीतील नेतृत्वाकडे राज्यांची सूत्रं गेल्यापासून साधारणतः गेल्या दहा वर्षांत देशातील अनेक राज्यांत परकीय गुंतवणुकीसाठी, केंद्राच्या योजनांमध्ये अधिक वाटा मिळवण्यासाठी, नवोद्योग आणि नवोपचारांना आकर्षित करण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विस्तारातून आपलं राज्य अधिकाधिक उद्योगस्नेही करण्यासाठी निकोप स्पर्धा सुरू आहे. या सर्व नवनेतृत्वामध्ये फडणवीस यांचा नंबर सर्वात वर आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील कारभाराकडे, इथल्या योजना आणि त्यासाठीच्या विविध तरतुदींकडे इतर राज्यांचं बारकाईने लक्ष असतं. त्या सर्व विकासेच्छु नवनेतृत्वाने अनुकरण करावं, असाच महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प आहे, यात वाद नाही. फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा, सम्यक विचारांचा आणि विकासशील नीतीचा प्रत्यय त्यातील वाक्या-वाक्यातून येतो आहे. कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, त्यातल्या बाबींवर भरघोस तरतुदी करूनही राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत ठेवण्याचं कौशल्य अर्थसंकल्पात साधलं आहे, हे विशेष. देशातली सगळीच राज्यं कर्जांच्या ओझ्याखाली वाकत चालली आहेत. वाढतं शहरीकरण, या शहरांना सुविधा पुरवण्याचा ताण, अस्थिर राजकारण आणि त्यामुळे करावा लागणारा मतदाराचा अधिकाधिक अनुनय, त्यातून आलेल्या 'फुकट वाटप योजना' आणि कर आकारणीचं केंद्रीकरण, यांमुळे राज्य कात्रीत सापडली आहेत. महाराष्ट्र यात वेगळा नाही. तरीही यावेळचा अर्थसंकल्प सर्वंकष वाटतो आहे, तो फडणवीस यांच्या धाडस आणि आत्मविश्वासामुळे. वातावरणीय बदल, पर्यावरणाचं रक्षण, सार्वजनिक स्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि किफायती वापर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन, त्यासाठी तंत्रशिक्षणाचा प्रसार, सर्वांसाठी आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी हे आजच्या 'जेन-झीं'चे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. अर्थसंकल्पाने या सगळ्याच क्षेत्रांना योग्यरीत्या न्याय दिला असून त्यातून राज्याची भविष्याची दिशाही स्पष्ट केली आहे. राज्यासाठी आणि राज्यातील जनतेसाठी अत्यंत दिलासादायक अर्थसंकल्प म्हणून या अर्थसंकल्पाची नोंद करावी लागेल. महाराष्ट्र हे देशातील विकसित राज्य आहे. विकसित राज्यासमोरही अनेक आव्हानं असतात. मागास राज्यांची थोडीशी प्रगतीही आकड्यांमध्ये, टक्केवारीत मोठी दिसते. विकसित राज्यांचं तसं नसतं. एका विशिष्ट स्थितीला पोहोचल्यानंतर त्यानंतरची प्रगती आकड्यांमध्ये धीम्या गतीनेच पुढे सरकताना दिसते. विकसित राज्यातील जनतेच्या आकांक्षाही विकसितच असतात! त्या आकांक्षांना पुरं पडण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक, नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रयोग राबवण्यासाठी घ्यावी लागणारी जोखीम सोपी नसते. राज्य प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर राज्यकर्त्यांसमोर उभी राहणारी आव्हानंही त्याच उंचीची असतात. कालच्या अर्थसंकल्पात या आव्हानांची जाणीव पदोपदी दिसते आहे. देशातलं प्रगत राज्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही गेली काही वर्षं आघाडीवर आहे. परस्परविरोधी; पण हे सत्य आहे. हा विरोधाभास संपवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. एकूण कर्जातला दोन लाखांचा वाटा सरकारने उचलला, तरी बऱ्याच शेतकऱ्यांना त्यातून पुढच्या प्रयत्नांसाठी दिलासा मिळू शकतो.

## संस्कृत सुभाषित

अपि शाकं पचानस्य सुखं वै मघवन् गृहे
अर्जितं स्वेन वीर्येण नाप्यपाश्रिय कंचन्।।
(वनपर्व, अध्याय १९३, २९, महाभारत)
अर्थ – कोणावरही अवलंबून न राहता स्वत:च्या हिंमतीवर मिळविलेली मीठ भाकर स्वत:च्या घरी खाण्यात सुख आहे.

## गुरु वचन



### त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक–परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखा मध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.


## उपदेशकथा

### चुका काढणे सोपे!

बादशहाच्या दरबारात एक चित्रकार आला व त्याने एक सुंदर चित्र काढले. बादशहास फार आनंद झाला. आता त्याला मोठे बक्षीस मिळणार हे पाहून दरबारातील इतर मंडळी जळफळली. अशाच एकाने सुचवले की, हे चित्र मुख्य चौकात लावावे आणि सर्वसामान्यांची प्रतिक्रिया अजमावावी. हे कसं करावं? असं बादशहाने विचारताच उत्तर आलं की, चित्रात जिथे चूक आढळेल तिथे प्रजेने फुली मारावी, असं जाहीर झाल्यावर ज्याने त्याने येऊन चित्रावर जागोजाग फुल्या मारल्या. चित्रकार नाराज झाला. तो अखेर बिरबलाकडे आला. बिरबलाने सुचविले की, त्याने असेच दुसरे चित्र काढावे. चौकात लावावे व खाली लिहावे, जो कोणी असे हुबेहुब चित्र काढू शकेल त्यानेच फुली मारावी. यावेळी मात्र एकही फुली पडली नाही.

कथा उपदेश : पात्रता नसताना दुसऱ्याच्या चुका काढणं खूप सोपं असतं, स्वत:त बदल घडवणं खूप अवघड!

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:अनुराधा |
| १० मार्च २०२६ | १९:०४:५२ |
| मंगळवार | योग:हर्षण ०८:२०:४६ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १२:४०:२२ |
| फाल्गुन शके | करण:बव २५:५४:३४+ |
| संवत्– १९४७ | सूर्य:कुम्भ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:वृश्चिक |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– फाल्गुन | मुस्लिम मास – रमजान |
| ऋतु– सौर वसंत | तारीख – २० |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:सप्तमी २५:५४:३४+ | सवित्रीबाई फुले स्मृतिदिन |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | 8 | 3 | 7 | | | 1 |
| | | 4 | | 9 | 2 | 8 | | 5 |
| | | | 4 | | | | 2 | |
| | | 1 | | 5 | 3 | 9 | | |
| | 6 | 3 | | | | 2 | 4 | |
| | | 9 | 2 | 6 | | 5 | | |
| | 7 | | | | 6 | | | |
| 6 | | 8 | 5 | 4 | | 7 | | |
| 3 | | | 1 | 7 | 8 | 6 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८८१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 4 | 5 | 3 | 9 | 8 | 2 | 6 | 1 |
| 3 | 2 | 6 | 1 | 4 | 7 | 8 | 5 | 9 |
| 1 | 9 | 8 | 5 | 6 | 2 | 7 | 4 | 3 |
| 4 | 8 | 1 | 7 | 2 | 5 | 3 | 9 | 6 |
| 2 | 6 | 3 | 8 | 1 | 9 | 4 | 7 | 5 |
| 5 | 7 | 9 | 6 | 3 | 4 | 1 | 8 | 2 |
| 6 | 5 | 4 | 2 | 7 | 3 | 9 | 1 | 8 |
| 8 | 3 | 7 | 9 | 5 | 1 | 6 | 2 | 4 |
| 9 | 1 | 2 | 4 | 8 | 6 | 5 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८७६ – ग्रॉम बेल ने थॉमस वॉटसनला जगाची प्रथम दूरध्वनी केली.
- १९०६ – फ्रांसमध्ये कोळसा खाणीत स्फोटात १,०६० लोक ठार झाले.
- १९४५ – जपानने वेतनामला स्वतंत्र घोषित केले.
- १९६८ – न्युझीलंडचा वेलींगटनमध्ये फेरी नाव बुडाली, त्यात २०० लोक ठार झाले.
- २००८ – मलेशियात पंतप्रधान अब्दुल्ला अहमद बदावी यांनी विरोधी पक्षाची राजीनाम्याची मागणी धुडकावत आगामी पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी शपथ ग्रहण केली.

### राष्ट्रीय

- १९३९ – हैद्राबादमध्ये दरड कोसळल्याने १७ गावांना नुकसानीची झळ पोहचली.
- २००८ – साखरेचे दर घटल्याने संकटात आलेले साखर कारखाने व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारने साखर कारखान्यांना २४८२ कोटींचा निधी मंजूर केला.
- २००८ – त्रिपुरात मुख्यमंत्री माणिक सरकारच्या नेतृत्वात माकपाप्रणित डाव्या आघाडी सरकारने सलग चौथ्या कार्यकाळासाठी पदभार स्वीकारला.

### जन्म

- १४५२ – सीसीलेचे राजा फरडीनंद दुसरा यांचा जन्म.
- १५०३ – जर्मन योद्धा फरडीनंद पहला यांचा जन्म.
- १७७६ – कॅनाडीची प्रथम महिला पंतप्रधान अवरील कीम कॅम्पबेलचे जन्म.

### निधन

- ००३७ – रोमन योद्धा टीबेरीयस कलाडीयस नेरो याचे निधन.
- १८२६ – पोर्तगालचे राजा जोहन पाचवा यांचे निधन.
- १९७३ – बरमुडाचे राज्यपाल सर रिचर्ड शार्पल्स् यांचे निधन.

## : SMS :

Filmi life aur Asli life me kya ANTAR hai?
Srdr:Film me bahut mushkilo k bad shadi hoti hai.
Asli life me shadi k bad bahut mushkil hoti hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.६ | २२.५ |
| अहमदनगर | ३३.७ | २२.६ |
| अकोला | ३६.५ | २३.५ |
| अमरावती | ३६ | २३.३ |
| बीड | ३७.७ | २१.९ |
| भंडारा | ३५.३ | २०.६ |
| बुलढाणा | ३४ | १७.५ |
| चंद्रपूर | ३६.६ | २२.१ |
| चेन्नई | ३६ | २१.७ |
| नवी दिल्ली | ३३.७ | १९.४ |
| धुळे | ३५.१ | २३.९ |
| गोंदिया | ३४.७ | १९.४ |
| जळगाव | ३६.७ | २३.४ |
| कोल्हापूर | ३४.६ | २१.३ |
| लातूर | ३४.७ | २१.५ |
| मुंबई | ३६.२ | २६.५ |
| नागपूर | ३५.६ | २०.८ |
| नांदेड | ३६.५ | २२.८ |
| नंदूरबार | ३३.८ | २४.१ |
| नाशिक | ३५.२ | २१.८ |
| पुणे | ३३.८ | २१.४ |
| पंढरपूर | ३५.४ | २२.३ |
| सातारा | ३५.१ | १९.४ |
| सांगली | ३५.४ | २१.४ |
| सोलापूर | ३५.६ | २४ |
| वर्धा | ३६.६ | २३ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग : हिरवा,शुभ दिशा:उत्तर हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा.

**तुळ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व आध्यात्मिक अंगीकारल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व प्रेम संबंधात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल.

**मिथुन :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल.

**मकर :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा: पूर्व आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल.


**सिंह :** शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: पूर्व व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :उत्तर आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : उत्तर पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८२



**आडवे शब्द**

१. आधार
४. हटकून, ठरवून
६. विकास पावणारे (राष्ट्र)
१०. फळातील द्रव
११. जुगाराचा एक प्रकार, माठ
१२. निकट, शेजारी
१३. आजाराची चिन्हे
१४. मौज, गंमत
१५. अडत्या
१६. मीठाची चव
१८. रोग्यास रक्त देणे
१९. एक श्वासरोग
२१. पत्रातील 'साष्टांग नमस्कार विनंतर विशेष'
२४. मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगाचे गाव
२८. संशय (हिंदी)
३०. सतत भटकण्यात आनंद मानणारा
३१. तपश्चर्या, तपस्या
३३. परिस्थिती
३५. देवाचे गाणे
३७. सुटकेचा मार्ग
३९. जंगल, वन
४०. वर्तुळ
४१. किंचित वक्रता
४२. अधाशीपणा
४४. विनोबांची सुबोध मराठी भगवद्गीता
४६. बाज विणण्याची पट्टी
४८. वजनकाटा
५०. मऊ
५२. नामशेष
५३. चोराच्या उलट्या बोंबा!
५५. नमुनेदार
५८. तांबडा, किंचित लाल
५९. पातळ खांब
६१. युक्ती
६३. बाळभाषेत पाणी
६५. शरीर
६६. हास्य लकेर पसरणे (वा.प्रा.)
६८. खुंटी, मेख
६९. डावा
७१. मित्र, दोस्त
७२. भविष्यकथनाचा एक प्रकार
७३. जोम, मस्ती
७५. लग्नातील नवरामुलगा
७८. लगतचा
८१. प्रकरण, घोटाळा, लफडे
८२. बद्दल

**उभे शब्द**

१. लिहिता वाचता न येणारा
२. ढीग
३. मुस्लिमांचा उपवासाचा महिना
४. मजुरांवरील अधिकारी
५. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
६. मिठी, घेराव
७. समतल
८. शीलवंत
९. लाख
१४. माकडांना खेळविणारा
१७. करमणूक
२०. बागवान
२१. संगत
२२. अनेक, नाना
२३. नाजूक
२४. पराजय
२५. शत्रू
२७. श्रीफळ
२८. ताजमहल बांधणारा राजा
२९. मनाचा ओढा
३०. पाठवणी
३१. आंब्याची पोळी
३२. नेता
३४. हिंदीत हिरवा
३६. नेत्रकटाक्ष
३७. वेतन
३८. सवाद्य
४१. हिंदीत केस
४३. नवरदेवास घालण्याचा हार
४५. श्रीमंत
४७. भांडण
४९. पोपट, राघू
५१. चर्चा
५२. निरर्थक बडबड
५४. हद्दपार
५६. इंग्रजीत धडा, अभ्यास
५७. नियमित पौष्टिक खाणे
६०. पहाटेची गाढ झोप
६१. ----- निखंज, माजी अष्टपैलू क्रिकेट खेळाडू
६२. सापाची एक जात
६३. चावट विनोद
६४. मत्सर
६६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६७. सारखा
७०. चिंतन
७१. आठवणी (हिंदी)
७४. डोलदार चालीचा महाकाय प्राणी
७६. तमाशा
७७. विपत्तीची कहाणी
७९. रंग
८०. किल्ली

**जम्बो शब्दकोडे क्र. ८८१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.खंडणी ४.विनाकारण ७.खबदाड ९.दम १०.मलमास ११.मग १२.गाळ १३.करुणाकर १४.रसना १५.गजगामिनी १७.बेजार १९.अलगद २१.पळापळ २३.सवलत २४.हट्टी २५.धन २६.नट २७.रामराम ३०.चाकरमानी ३३.राग ३४.नाग ३५.तम ३६.हिम ३८.कमरकस ३९.हिमालय ४१.देवघेव ४३.वन ४५.रजत ४७.मशक ५०.जाणीव ५१.नकार ५३.वंदनीय ५६.गाजावाजा ५८.गरजवंत ६०.रथारूढ ६१.सणक ६२.गराडा ६३.वळीव ६४.घोल ६५.अननस ७०.घमघमाट ७३.वजा ७४.वारसदार ७५.कढ ७६.उंडगा

उभे उत्तर : १.खंदक २.डमरु ३.झालर ४.विसरभोळा ५.कामना ६.राग ७.खळगा ८.दामिनी १०.मकरंद १२.गजरा २१.पट्टीचा २२.पगार २३.सनगर २५.धनी २८.मम २९.महिमा ३१.कप्पा ३२.मानव ३३.राम ३४.नासवणी ३७.मलम ३८.कव ३९.हितकारक ४०.यशवंतराव ४२.घेरा ४४.नवलकोल ४६.जनगणमन ४८.कद ४९.सजा ५०.राजा ५२.रज ५४.नीर ५५.यथार्थ ५६.गाढव ५७.वाळवण ५९.वंगण ६४.घोलवड ६५.कसर ६६.गोम ६७.भामा ६८.अस्त ६९.नवा ७०.घर ७१.घट ७२.टक ७४.जागा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबादारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मकोका गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहर गुन्हे शाखेच्या युनिट-४ पथकाने धडाकेबाज कारवाई करत मकोका गुन्ह्यातील फरार आरोपी आकाश उर्फ आक्की देवकर याला शिताफीने अटक केली. या कारवाईमुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पोलीस हवालदार विशाल इथापे, सुभाष आव्हाड, जहांगीर पठाण, अमजद शेख आणि पोलीस नाईक नागेशसिंग कुंवर हे पथक खाजगी वाहनातून गुन्हे प्रतिबंधक गस्त घालत असताना त्यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मकोका गुन्ह्यातील पाहिजे आरोपी आकाश उर्फ आक्की देवकर हा औंध येथील इंदिरा वसाहत, आंबेडकर चौक परिसरात येणार आहे. बातमीदाराने आरोपीच्या कपड्यांचे वर्णनही दिले. ही माहिती मिळताच पथकाने ती चतुःश्रृंगी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांना कळवली. त्यांनी माहितीची खात्री करून तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला. काही वेळातच वर्णनानुसार एक व्यक्ती त्या ठिकाणी पायी येताना दिसताच पोलिसांनी त्याला घेराव घालून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव आकाश उर्फ आक्की देवकर असल्याचे सांगितले. पुढील पडताळणीत तो मकोका गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाले

### रंगपंचमीनिमित्त 'लक्ष्मीबाई दगडूशेठ' दत्तमंदिरात रंगांची सजावट



पुणे (दैनिक संध्या) : बुधवार पेठेतील कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट च्यावतीने मंदिरात रंगपंचमीनिमित्त विविध रंग, पिचकारी, फुले अशी आगळीवेगळी सजावट करण्यात आली. मंदिरातील सर्व खांबांवर तसेच मुख्य गाभाऱ्याच्या बाजूला देखील रंग आणि पिचकाऱ्या लावण्यात आल्या. ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. शिवराज कदम जहागिरदार म्हणाले, रंगपंचमी ही आपला मराठी उत्सव. मात्र हा उत्सव आपण हळू हळू विसरत चाललो आहोत. विविध रंग, पिचकारी, फुगे अशा विविध प्रकारच्या साहित्याने ही रंगपंचमी साजरी होते. आता हे प्रमाण कमी होत असून याची आठवण पुन्हा एकदा व्हावी, याउद्देशाने मंदिरात ही सजावट करण्यात आली.



### पारंपरिक वेशात राजपूत महिलांचा 'होली मिलन' उत्सव साजरा

■ समस्त राजपूत महिला संघ, पुणे आयोजित आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'होली मिलन' कार्यक्रमाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : पारंपरिक राजपूत वेशात सजलेल्या महिलांनी होळी मिलन कार्यक्रमात रंग, संस्कृती आणि परंपरेची अनोखी झलक साकारली. गीत-नृत्य, खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून उपस्थित महिलांनी रंगोत्सवाचा उत्साहात आनंद साजरा केला. समस्त राजपूत महिला संघ, पुणे आयोजित आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त होली मिलन कार्यक्रमाचे आयोजन सहकारनगर जवळील सुरभी मंगल कार्यालय येथे करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष मीनल यज्ञदत्तसिंह हजारे, पदाधिकारी पूनम परदेशी, अंजली परदेशी, पूनम हजारे, सरिता कनोजिया, श्रुती किराड व सहकारी उपस्थित होते. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत, महिलांनी पारंपरिक गीत आणि लोकनृत्य सादर केले. कार्यक्रमात विविध खेळ देखील घेण्यात आले. मीनल हजारे म्हणाल्या, महिलांनी सशक्त बनत असताना आपल्या संस्कृतीचे जतन करून ती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलांवर उत्तम संस्कार करण्यासाठी प्रत्येक स्त्रीने जिजाऊंचा आदर्श घ्यावा आणि समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा सामना करण्यासाठी झाशीची राणी व राणी पद्मिनी यांच्यासारखे धैर्य दाखवा, असेही त्यांनी सांगितले. पूनम परदेशी म्हणाल्या, संस्थेच्या वतीने सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम राबवणे आणि राजपूतांचा गौरवशाली इतिहास, परंपरा व शौर्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा आमचा प्रमुख उद्देश आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी महिलांसाठी ‘सावन मिलन’ कार्यक्रम, तलवारबाजी शिबीर तसेच विविध समाजसुधारकांची व्याख्याने असे विविध उपक्रम राबविले जातात, असेही त्यांनी सांगितले.

### अश्वारोहण च्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उलगडला शिवकाळ

■ श्री शिवाजी कुल, पुणे संस्थेतर्फे आयोजन ; अश्वारोहण साहसी प्रात्यक्षिके



पुणे (दैनिक संध्या) : शो जम्पिंग ची चित्तथरारक प्रात्यक्षिके... आगीतून उडी घेणारे अश्व आणि अश्वारोहक... पारंपरिक युद्धकौशल्य असलेल्या टेंट पेगिंग चा थरार यांसह घोड्यांचा इतिहास, शौर्य आणि आधुनिक क्रीडा यांचा अद्भुत संगम पुणेकरांनी अनुभवला. सदाशिव पेठेतील पंतसचिव स्काऊट क्रीडांगणावर अश्वारोहण साहसी प्रात्यक्षिके पाहण्यासाठी स्काऊटच्या बालवीरांसह नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. श्री शिवाजी कुल, पुणे या स्काऊट गाईड खुल्या पथकाच्या वतीने पंतसचिव स्काऊट क्रीडांगणावर अश्वारोहण साहसी प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अ‍ॅकॅडमीतील सदस्यांनी यावेळी सादरीकरण केले. अकॅडमी चे प्रमुख गुणेश पुरंदरे यांचा स्वागत सन्मान ज्येष्ठ कुलवीर माधव धायगुडे यांच्या हस्ते करण्यात आला. गुणेश पुरंदरे म्हणाले, लहानपणीच्या लाकडी घोड्यापासून ते लग्नाच्या वेळी नवरदेवाच्या वरातीतील घोड्यापर्यंत घोडा आजही आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या परंपरेचा इतिहास आणि आधुनिक ऑलिम्पिक क्रीडा प्रकारातील अश्वारोहण यांची रोमांचक प्रात्यक्षिके सामान्यांना अनुभवायला मिळाली. सादरीकरणामध्ये घोडेस्वारी कशी करतात, घोड्यांच्या वेगांचे विविध प्रकार, आधुनिक काळातील अश्वरोहणाचे महत्त्व, शो जंपिंग, टेंट पेगिंग यांसह आगीतून उडी मारण्याचे प्रात्यक्षिक देखील यावेळी दाखविण्यात आले. अश्वारोहणाबद्दल लहान मुलांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना देखील यावेळी माहितीपर उत्तरे देण्यात आली.

# गौरी जोशी, डॉ. अमृता चांदोरकर यांना यंदाचे महिला उद्योजिका पुरस्कार

**याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान तर्फे आयोजन ; खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपुरे यांची उपस्थिती**

पुणे (दै. संध्या) :




शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा उपक्रम असलेल्या याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) तर्फे महिला उद्योजिका पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यांतर्गत वितरित होणारा स्वयंसिद्धा पुरस्कार जी.आर.इंजिनिअरींगच्या संचालिका गौरी जोशी यांना आणि युवा उद्योजिका पुरस्कार निरामय वेलनेसच्या संचालिका डॉ.अमृता चांदोरकर यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेच्या माणिक सुपेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला संस्थेच्या प्रतिभा संगमनेरकर, डॉ.स्वाती कुलकर्णी, श्रीकांत जोशी, उपेंद्र केळकर, मंजुषा वैद्य आदी उपस्थित होते. सेनापती बापट रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सुमंत मुळगावकर सभागृहात शनिवार, दिनांक १४ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यसभेच्या खासदार प्रा.डॉ.मेधा कुलकर्णी या असणार आहेत. महापौर मंजुषा नागपुरे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. युवा उपक्रमांतर्गत कै.सौ.सावित्रीबाई नारायण जोशी स्मरणार्थ स्वयंसिद्धा पुरस्कार आणि कै. मनोरमा शामराव कुंभोजकर स्मरणार्थ युवा उद्योजिका पुरस्कार दिला जातो. सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

अपारंपारिक ऊर्जा व भारतातील अनेक ठिकाणी यासंबंधीचे प्रकल्प उभे करणारे जीआर इंजिनियर्स कंपनीच्या संस्थापिका व संचालिका म्हणून गौरी जोशी कार्यरत आहेत. तर, निरामय वेलनेस सेंटरच्या माध्यमातून गेली दोन दशके लाखो रोग्यांना विनास्पर्श अनेक व्याधींपासून मुक्तता देणाऱ्या डॉ.अमृता चांदोरकर यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल गौरविण्यात येणार आहे. याशिवाय व्यवसायिक व नोकरदार महिलांसाठी 'व्यावसायिक कार्यामध्ये शिष्टाचार' या एका महत्त्वाच्या सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये डॉ. जयश्री फडणवीस मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे. शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ ही संस्था १९४० साली स्थापन करण्यात आली. युवा हा उपक्रम २००४ साली स्व. चंद्रकांत जोशी यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर येथील अधिवेशनात सुरु करण्यात आला होता.

## महिलांसाठी योग : दैनंदिन ताण कमी करण्याचा प्रभावी मार्ग

पुणे (दै. संध्या) :

महिलांना दैनंदिन जीवनातील कामे पूर्ण करताना अनेकदा मानसिक ताण आणि शारिरीक थकवा येतो. नंतर अशाच छोट्या ताणाचे रुपांतर मोठ्या आजारात होते. अशावेळी आपल्या रोजच्या जीवनातील ताण कमी करण्यासाठी महिलांनी स्वतःसाठी थोडा वेळ काढून योग करणे महत्वाचे आहे. योगाने केवळ शारिरीक स्वास्थ नाही तर मानसिक आरोग्य देखील सुधारते, असे मत योग अभ्यासक डॉ. योगिनी उज्वला यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त साधना पवार यांच्यावतीने स.प. महाविद्यालयातील लेडी रमाबाई हॉल मध्ये महिलांसाठी संवाद सत्र कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. योगिनी उज्वला उर्फ आऊ यांनी महिलांना त्यांच्या दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या विविध आव्हानांवर मात करण्यासाठी प्रभावी आणि साध्या साधना-तंत्रांची माहितीही दिली. स्वतःच्या श्वासाचा वापर करून



उत्तम आरोग्य निर्मीतीसाठी क्रिया योगाची माहिती त्यांनी दिली. श्वासन तंत्र, दीर्घ श्वसन, गरूड मुद्रा, महिलांना बरोबर लहान मुलांसाठी गणेश मुद्रा अशा विविध साधनेचा अभ्यास यावेळी उपस्थितांनी केला. डॉ. योगिनी उज्वला म्हणाल्या, क्रिया योग महिलांसाठी एक उत्तम मार्ग आहे, ज्यामुळे शरीर आणि मन संतुलित राहते. सकाळी थोडा योग केल्याने शरीरात ऊर्जा निर्माण होते, आणि प्राणायामामुळे मानसिक ताण कमी होतो, मन शांत होते. ध्यानामुळे महिला आपल्या भावनिक स्वास्थ्याची काळजी घेऊ शकतात. नियमित आसने पाठीचा वेदना, सांध्यांचे दुखणे टाळतात, रक्ताभिसरण सुधारते, हार्मोनल संतुलन राखले जाते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते, असेही त्यांनी सांगितले.

## मुलांसमवेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती व महिला दिन साजरा

विश्रांतवाडी (दै. संध्या) :



**स्वाभिमान सोशल फाऊंडेशनचा प्रेरणादायी उपक्रम**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य आणि आंतरराष्ट्रीय महिला दिन यानिमित्त स्वाभिमान सोशल फाऊंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने एक हृदयस्पर्शी आणि समाजाला प्रेरणा देणारा उपक्रम राबविण्यात आला. दिघी येथील मातृछाया बालकाश्रमातील बालकांसोबत जयंती साजरी करत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

याप्रसंगी फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी बालकाश्रमातील मुलांसाठी महिनाभर पुरेल इतके किराणा साहित्य देत त्यांच्या दैनंदिन गरजांना हातभार लावला. तसेच मुलांना खाऊ वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. कार्यक्रमादरम्यान बालकांशी संवाद साधत त्यांना प्रेम, आपुलकी आणि आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमाला बालकाश्रमाचे संचालक आनंद गाटे, फाऊंडेशनचे अध्यक्ष विश्वास देटे, उपाध्यक्ष विशाल (मोनू) रेड्डी, सेक्रेटरी सुशील देटे, कार्याध्यक्ष गुरुनाथ बिराजदार, निलेश (नाना) तारू, राजेश भोसले, आनंद सकपाळ, अरुण बिराजदार आणि प्रकाश बिराजदार उपस्थित होते. फाऊंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी नववर्षाच्या सुरुवातीलाच एक सामाजिक संकल्प केला आहे. स्वतःचा आणि कुटुंबातील सदस्यांचा वाढदिवस बालकाश्रमातील मुलांसमवेत साजरा करून त्यांच्यासोबत आनंद वाटण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. समाजाने दिलेले प्रेम आणि आधार लक्षात ठेवत समाजाला काहीतरी परत देण्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली.

यावेळी बोलताना उपाध्यक्ष विशाल (मोनू) रेड्डी म्हणाले, “आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि महिला दिनानिमित्त हा उपक्रम राबविला. आगामी काळातही महाराष्ट्रातील दुर्गम भागात अशा विविध सामाजिक आणि विधायक उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा प्रयत्न फाऊंडेशनतर्फे करण्यात येणार आहे.”

या उपक्रमामुळे बालकाश्रमातील मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य उपस्थितांना भावूक करून गेले. समाजातील प्रत्येकाने अशा उपक्रमांमधून गरजूंच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करावेत, असा सामाजिक संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

## अग्नीशास्त्र बाळगणाऱ्या इसमाला सापळा रचून अटक

पुणे (दै. संध्या) :

लक्ष्मी नगर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान पोलीस हवालदार अमोल गायकवाड व पोलीस अंमलदार कादिर शेख यांना त्यांच्या गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की एक इसम येरवड्यातील डेक्कन कॉलेजच्या मोकळ्या जागेत थांबलेला आहे आणि त्याच्या अंगावर कळ्या रंगाचा टी-शर्ट व कळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेला असून त्याच्याजवळ देशी बनावटीचे पिस्टल आहे. ही बातमी मिळाल्याने त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार यांना सांगितल्याने लगेचच सदरची बातमी सहायक पोलीस निरीक्षक नंदनवार यांनी लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांना कळविली. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी लगेचच कारवाई करण्याचे आदेश दिले.






नंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार पोलीस अंमलदार अमोल गायकवाड. पोलीस अंमलदार कादिर शेख, कांबळे पोलीस आमदार अक्षय शिंदे, राहुल परदेशी, अतुल जाधव, सुरज ओंबासे यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जाऊन एक आडोसा घेतला व त्या जागेची पाहणी केली असता सदर इसम कोणाची तरी वाट बघत थांबलेला आहे असे या सर्व पोलिसांना दिसले, त्यानंतर या पोलिसांनी त्या विश्वास हटकले त्यावेळेस तो कावरा बावरा होऊन त्यातून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा वरील पोलीस पथकाने जागीच त्याला पकडून त्याला त्याचे नाव व त्याचा राहण्याचा पत्ता विचारला. त्याने आपले नाव सोनू सिंग दीपक सिंग बावरी वय 22 राहणार सर्वे नंबर 10 पोते वस्ती, मंगारी बाबा मंदिरा शेजारी येरवडा पुणे असे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी लगेचच पंचा समक्ष त्याची अंग झडती घेतल्यानंतर त्याच्याजवळ एक देशी बनावटी पिस्टल व एक जिवंत काढतोस मिळून आले, त्यानंतर लगेचच पोलिसांनी त्याला पुढील कारवाईसाठी ताब्यात घेतले. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त पुणे अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त रजनीकांत चुलुमुला परिमंडळ ४, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनीलजैतापूरकर व लक्ष्मीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## पुणे धनकवडीत अत्यंत धोकादायक खड्डा

पुणे (दै. संध्या) :

पुणे शहरातील धनकवडीच्या पुण्याईनगर २०/१ परिसरात रस्त्याच्या कडेला पडलेला १० फूट खोल मोठा व धोकादायक खड्डा त्यावरील आच्छादन तुटल्याने नागरिकांसाठी अत्यंत डोकेदुखी ठरत आहे. या खड्ड्यामुळे वाहनचालक व पादचारी,लहान मुलांना यांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला असून तो खड्डा तात्काळ दुरुस्तीची मागणी श्रीमती वर्षाताई नाईक यांनी केली आहे. युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय युवती उपाध्यक्षा श्रीमती वर्षाताई नाईक यांनी या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. “हा खड्डा लवकरात लवकर बुजविण्यात यावा, अन्यथा मोठा अपघात होण्याची शक्यता आहे,” असे त्यांनी सांगितले. या करीत संबधीत यंत्रणेचे गोरक्ष



कदम यांना प्रत्यक्ष त्या ठिकाणी बोलावून घेत ह्या धोकादायक खड्ड्याची वस्तुस्थिती दाखवून दिली. परिसरातील नागरिकांनीही स्थानिक प्रशासनाने तातडीने कारवाई करून रस्त्यालगत असणाऱ्या दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सध्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून रात्रीच्या वेळी हा खड्डा अधिक धोकादायक ठरत आहे.

# ‘महेश इंडस्ट्रियल ग्रुपकडून कर्तृत्ववान उद्योजकांचा सन्मान

**विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार : महेश इंडस्ट्रियल ग्रुपकडून उद्योग, नवसंकल्पना आणि सामाजिक कार्यातील मान्यवरांचा सन्मान**

पुणे (दै. संध्या) :

उद्योग, नवसंकल्पना आणि सामाजिक नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी महेश इंडस्ट्रियल ग्रुप यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पुरस्कार वितरण सोहळा पुण्यातील पी.वाय.सी. हिंदू जिमखाना येथे उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उद्योजक आणि मान्यवर व्यक्तिमत्त्वांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर येथील झंवर समूहाचे कार्यकारी संचालक नीरज झंवर उपस्थित होते. त्याच बरोबर जितेंद्र लखोटिया, श्यामसुंदर भुताडा, सागर राठी उपस्थित होते. उद्योग, व्यवसाय,




प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यात विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यावर्षी ‘उत्कृष्ट उद्योजक’ ईश्वर लढ्ढा, ‘उत्कृष्ट उद्योजिका’ दीपिका माहेश्वरी ‘सर्वोत्तम व्यावसायिक कार्यकारी’ आशिष भट्टाड, ‘सर्वोत्कृष्ट नवोन्मेष पुरस्कार’ रिशभ तोतला, नेक्स्ट जेन बिझनेस लेगसी पुरस्कार कुश राठी, ‘उत्कृष्ट नागरी सेवा पुरस्कार’ पुणे येथील आयकर विभागाचे संयुक्त आयुक्त पुनित डागा यांना प्रदान करण्यात आला. सर्व मान्यवरांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे नीरज झंवर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, उद्योग क्षेत्रात यश मिळविण्यासाठी केवळ भांडवल पुरेसे नसते; त्यासाठी दूरदृष्टी, सातत्यपूर्ण परिश्रम आणि समाजाप्रती असलेली बांधिलकीही आवश्यक असते. आज सन्मानित झालेली व्यक्तिमत्त्वे तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. अशा प्रकारचे सन्मान सोहळे उद्योजकतेला चालना देतात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यास मदत करतात.

या पुरस्कार सोहळ्याच्या आयोजनात पुरस्कार समिती रश्मी भट्टड, रितू डालिया, कीर्ती लखोटिया, आशिष डालिया, निलेश लढ्ढ, नेहा लढ्ढ, कोहिनूर इंदाणी, नीरज मंत्री, उमेश धूत, अश्विन चांडक, मनीष राठी, प्रदीप राठी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उद्योग, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणारा हा सोहळा पुण्यातील उद्योगविश्वासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरला, असे आयोजकांनी सांगितले.

# पुणे–सोलापूर महामार्गावरील अपघात थांबेना

## उरुळी कांचन उरूसावरून परतणाऱ्या व्यक्तीचा बल्करच्या धडकेत जागीच मृत्यू



**उरुळी कांचन (दै. संध्या) :**

पुणे–सोलापूर महामार्गावर अपघातांची मालिका काही थांबण्याचे नाव घेत नाही. उरुळी कांचन (ता. हवेली) येथे सुरू असलेल्या काळभैरवनाथाच्या उरूसाला गेलेल्या एका व्यक्तीचा महामार्ग ओलांडताना भरधाव बल्करच्या धडकेत चिरडून जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (८ मार्च) रात्री घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्तम बबन भंडारे (वय ५३ वर्ष) सध्या रा. शिंदवणे रोड उरुळी कांचन, मुळगाव नाशिक, हे उरुळी कांचन येथे सुरू असलेल्या उरूसाला गेले होते. उरूसावरून परत घरी जात असताना त्यांनी पुणे–सोलापूर महामार्गावरील शिंदवणे चौक येथे रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी सोलापूर वरून पुण्याच्या च्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या बल्कर (क्र. MH-12 SX 8985) ने त्यांना जबर धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बल्करचा टायर त्यांच्या डोक्यावरून गेल्याने डोक्याचा अक्षरशः चेंदामेंदा होऊन कुटुंबासमोरच त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस स्टेशनचे पो हवा सचिन जगताप, प्रवीण चौधर घटनास्थळी दाखल झाले. अपघात करून फरार झालेल्या बल्करचा पाठलाग करून चालक प्रणव प्रदीप शिंदे (वय २०) याला पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

पुणे–सोलापूर महामार्गावर उरुळी कांचन परिसर अपघातांचा केंद्रबिंदू बनत चालला असून रस्ता ओलांडण्याच्या ठिकाणी पोलीस तैनात करणे, सिग्नल व्यवस्था, स्पीड नियंत्रण, दर्शक फलक, आणि सुरक्षित पादचारी मार्ग यांसारख्या ठोस उपाययोजना तातडीने करण्याची नागरिकांची मागणी

### अपघाताचे धोकादायक चौक

स्वरगंधार समोरील चौक, पोलीस स्टेशन समोरील चौक, प्रयागधाम चौक, सहजपुर फाटा ते नायगाव फाटा हा सुमारे सात किलोमीटरचा पट्टा अपघातांचा हॉटस्पॉट बनला असून अनेकांचे जीव गेले, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे.

### प्रशासनाकडून ठोस उपाययोजना कधी?

उरुळी कांचन येथे वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी काही उपाययोजना करण्यात आल्या असल्या तरी त्याच ठिकाणी सतत अपघात होत असल्याने प्रशासनाच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या सात दिवसांत उरुळी कांचन परिसरात झालेल्या अपघातांमध्ये तीन जणांचा बळी गेला आहे.

सोरतापवाडी ग्रा. हद्दीत एका पुरुषाचा अपघातात जागीच मृत्यू, चंदनवाडी फाटा येथे ७० वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू, आणि आता शिंदवणे चौकात उरूसावरून परतणाऱ्या व्यक्तीचा डोक्याचा चेंदामेंदा होऊन मृत्यू, यामुळे पुणे–सोलापूर महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. शाळा सुटण्याच्या वेळेस महामार्गावरील शिंदवणे चौक आणि ए-लाईट चौक ओलांडून जाण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी असते. या वेळी वाहनांचा वेग प्रचंड असतो. रस्ता ओलांडताना विद्यार्थ्यांना अक्षरशः जीव मुठीत धरून धाव घ्यावी लागत असल्याचे पालकांनी सांगितले.

वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस नेमले असतानाही अपघातांची मालिका सुरूच असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. "वाहतूक नियंत्रीत ठेवण्यासाठी नेमलेले पोलीस नेमके करतात तरी काय?" असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

---

थोडक्यात पण महत्वाचे...



## 9111 डोंबिवलीकरांनी रचला इतिहास, मोडला सांगलीकरांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

डोंबिवली (दैनिक संध्या) : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९ हजार १११ महिला आणि विद्यार्थीनीनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत रविवारी येथील श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला. या आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी सांगितले. त्या ठिकाणी या आधी ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन तो रेकॉर्ड रचला होता, मात्र तो रविवारी डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी हा रेकॉर्ड केला. त्यावेळी स्वप्नील डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या पत्नी सुहासिनी रविंद्र चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे सर्टिफिकेट व मेडल हस्तांतरीत केले. त्यावेळी रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानत लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता, त्या निमित्ताने महिला आणि विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे, हा रेकॉर्ड मी भारत मातेच्या चरणी समर्पित करतो असेही उद्गार त्यांनी यावेळी काढले. कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीचे त्यांनी आभार मानले. शिक्षक, विद्यार्थी आदींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सारा आसमंत भारत माता की जय, जय श्रीराम, वंदे मातरमने दणाणून सोडला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वर्ल्ड रेकॉर्ड केल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. लेझीमचा झुंकार सर्वत्र निनादत होता, ढोल ताशांच्या गजरात त्या रेकॉर्डचे हजारो डोंबिवलीकरांनी स्वागत केले, आणि प्रत्येकाच्या सहभागाबद्दल कौतुक करण्यात आले. अशा दैदिप्यमान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी पहाटेपासून डोंबिवलीकर प्रतीक्षेत होता, अखेर वर्ल्ड रेकॉर्डची घोषणा होताच प्रचंड जल्लोषात त्याचा आनंद व्यक्त करण्यात आला.



## शेजारच्या गावच्या पोलिस पाटलांनीही मदतीला धावावे : राजेंद्रसिंह गौर

जेजुरी (दैनिक संध्या) : पुढील काही महिन्यांत ग्रामीण भागात यात्रा-जत्रांचा हंगाम सुरू होणार आहे. या काळात गावोगावी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी केवळ त्या गावच्या पोलिस पाटलांवर न राहता शेजारच्या गावातील पोलिस पाटलांनीही मदतीला पुढे यावे, अशा सूचना भोर उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांनी दिल्या. पुरंदर तालुक्यातील जेजुरी पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या गावांच्या पोलिस पाटलांची दप्तर तपासणी सोमवार दिनांक 9 रोजी राजेंद्र सिंह गौर यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी जेजुरी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी दीपक वाकचौरे तसेच विविध गावांचे पोलिस पाटील उपस्थित होते. या बैठकीत गौर यांनी प्रत्येक पोलिस पाटलाच्या गावातील कायदा-सुव्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. आगामी काळात गावांमध्ये होणारे कार्यक्रम, यात्रा-जत्रा आणि संभाव्य गर्दी लक्षात घेऊन कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यात्रा-जत्रांच्या काळात शेजारच्या गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. त्यामुळे संबंधित गावच्या पोलिस पाटलांनी आपली जबाबदारी पार पाडावीच; मात्र शेजारच्या गावचे पोलिस पाटीलही त्या ठिकाणी जाऊन मदत करावी. पोलिस प्रशासनाच्या सूचनेची वाट न पाहता स्वतःहून पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असेही गौर यांनी स्पष्ट केले. यात्रा-जत्रा शांततेत आणि सुरळीत पार पडाव्यात यासाठी स्थानिक यात्रा समितीशी समन्वय साधावा. तसेच कायदा-सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणारे समाजकंटक आढळल्यास त्याची तात्काळ माहिती पोलिस प्रशासनाला द्यावी आणि आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी, असे आवाहनही त्यांनी पोलिस पाटलांना केले.

---

## सौ. कोमल संदेश आव्हाळे यांना जिल्हा परिषदेमध्ये मोठे पद देण्याची मागणी

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

हवेली तालुक्यातील थेऊर - आव्हाळवाडी गटातुन प्रचंड मतांनी निवडून आलेल्या सौ. कोमल संदेश आव्हाळे यांना पुणे जिल्हा परिषदेत मोठे पद मिळावे अशी मागणी अनेक नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडे केली आहे .पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणूकीमध्ये हवेली तालुक्यातील ६ जागां पैकी ४ जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसने जिंकल्या तर १ जागा भाजप व १ जागा शिवसेनेने जिंकली . हवेली तालुका हा जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका आहे . त्याचे राजकीय व प्रतिनिधित्व वाढवण्याची मागणी नेहमीच होत असते. पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका २०२६ च्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) निर्विवाद वर्चस्व स्थापन केले आहे . ज्यामुळे पुणे जिल्ह्याचे उपाध्यक्ष किंवा समितीचे मोठे पद सौ. कोमळ संदेश आव्हाळे यांना मिळण्याची शक्यता आहे. सौ



कोमल संदेश आव्हाळे या हवेली तालुक्यातुन सर्वात जास्त म्हणजे २२३४३एवढया प्रचंड मतांनी निवडून आल्या आहेत .त्यामुळे सौ. कोमल आव्हाळे यांना राष्ट्रवादी प्राधान्य देईल अशी आशा नागरिकांना आहे . त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार या नक्की हवेली तालुक्यातुन सर्वाधिक मतांनी निवडून आलेल्या सौ. कोमल आव्हाळे यांना न्याय देतील असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

---

## मला जिजाऊ, सावित्री, रमाई तुमच्यामध्ये दिसावी’ पथनाट्यातून जागर

### *जागतिक महिला दिन अर्धापूर पोलिस ठाण्यात पथनाट्य सादर करून केला साजरा*

**अर्धापूर (दै. संध्या) :**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अर्धापूर पोलीस ठाण्यात महिला सक्षमीकरणासाठी स्वामी विवेकानंद अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती केली. शहरातील स्वामी विवेकानंद अकॅडमी ही शिक्षणा बरोबरच सामाजिक परिवर्तन करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मुल्य रूजवते असते. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त बेटी बचाओ बेटी पढाओ हे पथनाट्य सादर करून विद्यार्थ्यांनी महिला सक्षमीकरणाचा जागर केला.यावेळी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णुकांत कराळे,सहाय्यक पोलीस निरीक्षक चित्तरंजन ठेमकेवाड, शिक्षक योगेश पवळे,पोलीस



कर्मचारी,होमगार्ड तसेच अकॅडमीचे संचालक सचिन हट्टेकर,अकॅडमीचे शिक्षक माधव पवार,शुभम हिंगमिरे, अमोल सरोदे,संतोष पारटकर आदी उपस्थित होते.या पथनाट्यात स्वाती थाते,अक्षरा गुंजकर,सृष्टी राऊत,दुर्गा पवार,संजना भोकरे,सानिका पवार, वैभवी राऊत,चैतन्य शिंगारे,गायत्री भोकरे,संभाजी क्षीरसागर,अवधूत शिंदे,अप्पाराव भोकरे,मयूर क्षीरसागर,पृथ्वीराज क्षीरसागर आदिंनी सादरीकरण केले.यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या वतीने प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले आणि पथनाट्य सादर करून आगळावेगळा जागतिक महिला दिन सादर केल्याने संपूर्ण अर्धापूर तालुक्यातून अकॅडमीचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

---

## आरोग्यदुत युवराज काकडे यांची हवेली पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड

### उपसभापती विदया गायकवाड

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवराज हिरामण काकडे यांची हवेली पंचायत समितीच्या सभापतीपदी, तर अपक्ष सदस्य विद्या दत्तात्रय गायकवाड उपसभापतपदी यांची बिनविरोध निवड झाली आहे. हवेली तालुक्यातील सभापतीपद अपक्षाच्या पाठिंब्यामुळे सत्ता स्थापन झाल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. हवेली पंचायत समितीच्या सभागृहात सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभापती पदासाठी युवराज काकडे तर उपसभापती पदासाठी अपक्ष सदस्य विद्या गायकवाड यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांनी दोघांचीही बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. निवड जाहीर होताच उपस्थित सदस्यांनी सभापती व उपसभापती यांचे अभिनंदन केले.



यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित सभापती युवराज काकडे म्हणाले की, हवेली तालुक्यातील विकासकामे करताना सर्व सदस्यांना बरोबर घेऊन काम केले जाईल. गावागावातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधा यावर विशेष भर देत तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातील. तर उपसभापती विद्या दत्तात्रय गायकवाड यांनी देखील सर्व सदस्यांच्या सहकार्याने तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

हवेली पंचायत समितीच्या निवडणूकीमध्ये १२ जागा पैकी सहा राष्ट्रवादी काँग्रेसला, चार भाजपला एक शिवसेनेला तर एका जागी अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत.

लोणी काळभोर - वडकी गणात अपक्ष उमेदवार विदया दत्तात्रय गायकवाड यांनी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना धक्का देत विजय संपादन केला आहे. त्यामुळे गायकवाड यांच्या मताला खुपच महत्व आले होते. जिकडे विदया गायकवाड यांचे मत तिकडे सभापती अशी चर्चा नागरिकांच्या मध्ये रंगली होती. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला बहुमताचा आकडा पार करण्यासाठी अपक्ष सदस्य विदया गायकवाड यांची मदत लागणार होती . राष्ट्रवादी काँग्रेसला सत्ता स्थापन करण्यासाठी अपक्ष म्हणून निवडून आलेल्या विदया गायकवाड यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

---

# देशातील वाढत्या रस्ते अपघातांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे

### प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची संसदेत मागणी; महामार्गालगत दारूच्या दुकानांना परवानगी देऊ नये

**पुणे (दै. संध्या) :**

देशात वाढत्या रस्ते अपघातांच्या गंभीर समस्येकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्यकाल उल्लेखाद्वारे केली. बेफिकीर वाहनचालक, मद्यपान करून वाहन चालवणे तसेच सोशल मीडियासाठी रस्ते व महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याची वाढती प्रवृत्ती ही अपघातांची नवी व चिंताजनक कारणे ठरत असल्याचे




त्यांनी नमूद केले. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशात सुमारे १.७८ लाख लोकांचा रस्ते अपघातांमध्ये मृत्यू झाला आहे. म्हणजेच दररोज शेकडो कुटुंबांवर ही दुर्घटना ओढवते. विशेषतः १८ ते ३४ वयोगटातील तरुणांचे प्रमाण सुमारे ६० टक्के असल्याने ही बाब अधिक चिंताजनक आहे. महाराष्ट्रातही आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२४ मध्ये ३६ हजार ८४ रस्ते अपघातांची नोंद झाली असून, त्यात १५ हजार ३३५ जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यातही परिस्थिती चिंताजनक असून, पुणे पोलिसांच्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये १,४०४ अपघातांमध्ये ३२० जणांचा मृत्यू झाला, तर १,३२० जण जखमी झाले. २०२३ मध्ये ही संख्या १,२३० होती."

सोशल मीडियासाठी रस्ते व महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असून अपघातांचा धोका वाढत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. मोटार वाहन कायदा १९८८ अंतर्गत मद्यपान करून वाहन चालवणे व बेफिकीर वाहनचालकांवर कठोर शिक्षेची तरतूद असली, तरी अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर मद्यपान करून वाहन चालवणे व धोकादायक वाहनचालकांवर किमान कठोर शिक्षा निश्चित करणे, रस्ते अपघातांशी संबंधित मृत्यू प्रकरणांसाठी फास्ट-ट्रॅक न्यायालये स्थापन करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित वेग शोध प्रणाली, ब्रेथ ॲनालायझर व सीसीटीव्ही यांचा व्यापक वापर करणे, तसेच मुंबई–पुणे द्रुतगती मार्गासारख्या उच्च वेगाच्या मार्गांवर अपघातप्रवण ठिकाणांचे नियमित सुरक्षा लेखापरीक्षण करणे, अशा उपाययोजनांची मागणी त्यांनी केली. तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये रस्ते सुरक्षा व जबाबदार वाहनचालकांबाबत जनजागृती मोहीम राबविणे आणि अपघातग्रस्त व त्यांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली.

---

## नवी मुंबईत ‘नॅशनल गांधी शिल्प बाजार’ हस्तकला प्रदर्शनाचे उद्‌घाटन

■ भारताची समृद्ध हस्तकला परंपरा ही आपल्या संस्कृतीची ओळख – मंत्री संजय सावकारे

**नवी मुंबई (दै. संध्या) :**

देशभरातील पारंपरिक हस्तकलेचा ठेवा एकाच छताखाली अनुभवण्याची संधी देणाऱ्या ‘नॅशनल गांधी शिल्प बाजार’ या भव्य हस्तकला प्रदर्शनाचे उद्‌घाटन महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील अर्बन हाट येथे करण्यात आले. हे प्रदर्शन ६ मार्च ते १५ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १०.३० ते रात्री १० वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. या कार्यक्रमाला अमृत राज (विकास आयुक्त – हस्तकला, वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार) तसेच अंशू सिन्हा (प्रधान सचिव – वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन) विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री संजय सावकारे म्हणाले की, “भारताची समृद्ध हस्तकला परंपरा ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. ‘नॅशनल गांधी शिल्प बाजार’सारखे उपक्रम कारागिरांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देतात आणि त्यांच्या कलेला योग्य व्यासपीठ मिळवून देतात. अशा प्रदर्शनांमुळे देशभरातील कारागिरांना प्रोत्साहन मिळते तसेच नागरिकांना भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळते.”

## थोडक्यात पण महत्वाचे...




### सुवर्णा माने यांची अनिवासी भारतीय सेलच्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षपदी नियुक्ती

बारामती (दैनिक संध्या) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनिवासी भारतीय सेलच्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे हे नियुक्तीपत्र नगरसेवक व स्थायी समिती सदस्य प्रशांत जगताप व प्रदेश काँग्रेस अनिवासी भारतीय विभागाचे अध्यक्षा विद्या कदम यांच्या हस्ते डेक्कन भांडारकर रोड येथील रविराज हॉटेलमध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमांमध्ये देण्यात आले. महिलांचे कुटुंबाबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील मोठे योगदान आहे असे प्रतिपादन विद्या कदम यांनी केले. यावेळी अॅड, धनंजय बुद्धिवंत, प्रदेश काँग्रेस अल्पसंख्यांक ख्रिश्चन विभागाचे अध्यक्ष डॉ मॅन्युअल डिसोजा, काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सचिव अर्चना शहा, राज्य महिला सचिव मेघा शेगर, महिला राज्य उपाध्यक्षा अॅड, रेखा माने, पुणे जिल्हा महिला अध्यक्ष मुमताज शेख, निवृत्त पोलीस निरीक्षक आनंद जंगम, अलिशा बुद्धिवंत, वनिता जाधव आदि यावेळी उपस्थित होते.

### भारतीय क्रिकेट संघाचा विजय प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद : सुनेत्रा पवार

बारामती (दैनिक संध्या) : टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंड संघाचा पराभव करून विश्वविजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या संदेशात म्हणाल्या की, भारतीय संघाने संपूर्ण टी-२० विश्वचषक स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सामन्यात न्यूझीलंडवर दणदणीत विजय मिळवला. खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, संघभावना आणि समर्पित खेळभावना ही संपूर्ण देशातील क्रीडाप्रेमींसाठी अभिमानाची बाब आहे. या ऐतिहासिक विजयामुळे देशभर आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भारतीय संघाने तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषकावर आपले नाव कोरले असून भारताचा तिरंगा जगभर अभिमानाने फडकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे. भारतीय संघाने भविष्यातही अशीच दमदार कामगिरी करत देशाचे नाव जागतिक क्रीडा क्षेत्रात अधिक उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या आहेत.

### दूध दर कमी असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील पशुपालक शेतकरी सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. एकीकडे जनावरांच्या चाऱ्यासाठी आवश्यक असणाऱ्या कडब्याचे दर तब्बल 4000 ते 4500 रुपये शेकड्यांपर्यंत पोहोचले असताना दुसरीकडे दुधाला मात्र केवळ 38 ते 40 रुपये प्रति लिटर असा अल्प दर मिळत आहे. या प्रमाणामुळे दूध उत्पादनाचा खर्च आणि प्रत्यक्ष मिळणारे उत्पन्न यांचा मेळ बसत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून, ग्रामीण भागातील महत्त्वाचा समजला जाणारा दुग्ध व्यवसाय आता तोट्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. गेल्या काही वर्षातील कडब्याचा हा उच्चांशी दर असल्याचे बोलले जात आहे. काही वर्षांपूर्वी 1500ते 2000 रुपये शेकडा मिळणारा कडबा आता थेट दुप्पट दराने विकला जात आहे. त्यामुळे जनावरांना दररोजचाचारा पुरवणे हे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनवले आहे. एका जनावरासाठी लागणारा कडबा, पेंड,भुसा आणि औषधोपचार यांचा खर्च पाहता महिन्याला हजारो रुपयांचा अतिरिक्त भार शेतकऱ्यांच्या खिशावर पडत आहे.कडब्याच्या वाढत्या किमतीमागे पावसाचे अनियमित प्रमाण आणि ज्वारी बाजरीच्या उत्पादनात झालेली घट ही मुख्य कारणे असल्याचे सांगितले जात आहे.तसेच, कडब्याच्या बाजारावर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने व्यापाऱ्यांकडून मनमानी दर आकारले जात असल्याची संतप्त प्रतीक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत दुसरीकडे दूध उत्पादकांना दिलासा मिळण्याऐवजी निराशाच पदरी पडत आहे. अनेक दूध संघ आणि खाजगी डेअऱ्या अद्यापही 38 ते 40 रुपये दरानेच दूध खरेदी करत आहेत.महागाईच्या तुलनेत हा दर खूप कमी असून, जाणवरांच्या देखभालीचा खर्चही यातून निघणे कठीण झाले आहे.जर हीच परिस्थिती कायम राहिली,तर पशुपालक शेतकरी जनावरे विकण्याच्या मनस्थितीत असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मोडण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने दुधाला किमान हमीभाव जाहीर करावा आणि चारा उपलब्धतेसाठी ठोस पावले उचलावीत.

### पारुंडे येथे महिला दिन उत्साहात संपन्न



जुन्नर (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र पारुंडे (ता. जुन्नर) येथील महिलांनी एकत्र येऊन वेद कस्तुरी कृषी पर्यटन केंद्र या ठिकाणी ८ मार्च रोजी महिला दिन अत्यंत उत्साहात व हसत खेळत साजरा केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ.कल्याणी पुंडे होत्या. महिलांचे प्रेरणास्थान क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. श्री ब्रह्मनाथ विद्यालयाच्या माजी शिक्षिका मंगल तांबे यांनी प्रास्ताविक करताना महिला दिनाचे महत्त्व सांगून सर्वांचे स्वागत केले. उपस्थित अनेक महिलांनी समाजातील महिलांचे स्थान व आपले अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कल्याणी पुंडे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपण कुटुंबाचा आधार व संस्कार आहोत. कुटुंबा ची जबाबदारी सांभाळत असताना धावपळीच्या युगात स्वतःच्या आरोग्याकडे देखील लक्ष देणे खूप आवश्यक झाले आहे. आजार सांभाळत बसू नका. वेळच्यावेळी संपूर्ण आरोग्याची तपासणी करून घ्या. महिलांमध्ये हिमोग्लोबिन व कॅल्शियमचे प्रमाण खूपच कमी होत आहे. स्वतः सक्षम असाल तरच कुटुंबाची जबाबदारी पेलू शकाल. आपल्याला हे सोनेरी दिवस ज्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर अशा अनेक मातांमुळे आलेले आहेत. त्यांना आपण कधीही विसरू शकणार नाही. या कार्यक्रमात माजी सरपंच सविता जाधव, डॉ. कल्याणी पुंडे, मंगल तांबे, मंदाकिनी पवार, जरीना शेख, अर्चना पवार ,मीना जाधव अशा महिलांसह मोठ्या संख्येने माता भगिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता जाधव तर आभार मंगल तांबे यांनी व्यक्त केले. कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

# आरोग्य जपायचे असेल तर खेळाशिवाय पर्याय नाही - बाबु पाटे

**राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानच्यावतीने भव्यदोरी उडी व जोरदंड स्पर्धा संपन्न**



**नारायणगाव (दै. संध्या)**

शिवजयंती निमित्ताने राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश उर्फ बाबू पाटे यांच्या संकल्पनेतून राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या माध्यमातून मुला-मुलींसाठी भव्यदोरी उडी व जोरदंड या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून जवळपास साडेसहाशे मुला, मुलींनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक निबंधक अधिकारी निलेश धोंगडे यांच्याहस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य जपायचे असेल तर खेळाशिवाय पर्याय नाही. आज अनेक मुलांच्या हातात मोबाईल असतो. पालकांनी मुलांकडून मोबाईल काढून घ्यावा व मुलांना खेळण्यासाठी मैदानावर पाठवावे. असा आरोग्यविषयक सल्ला प्रथम लोकनियुक्त सरपंच तथा उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी दिला. या स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान तर्फे रोख स्वरूपात रक्कम, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन मुला, मुलींचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेच्या निमित्ताने नारायणगावचे माजी उपसरपंच संतोष वाजगे, तंटामुक्तीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर औटी, विकास तोडकरी., ग्रामपंचायत सदस्य आरिफ आतार, संतोष दांगट, हेमंत कोल्हे, जालिंदर खैरे, भागेश्वर डेरे, नंदू अडसरे, मंदार पाटे, निलेश गोरडे, तेजस पाटे, यांसह विद्यार्थी, शिक्षक, महिला, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन शिक्षक महेंद्र तोडकर, अजय कानडे, दादू कोठाळे, रवी शिंदे, यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महादेव खैरे यांनी केले.

## रामलिंग महिला उन्नती संस्थेकडून कर्तृत्ववान महिलांचा गौरव




**कवठे येमाई (दै. संध्या)**

**जागतिक महिला दिनानिमित्त तालुकास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न**

रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, रामलिंग (शिरूर) जि.पुणे यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त तालुकास्तरीय कर्तृत्ववान महिला पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बाबुराव नगर येथील डेक्कन स्कूल येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता,सावित्रीबाई फुले, माँ साहेब जिजाऊ तसेच गणपती बाप्पा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला औपचारिक प्रारंभ करण्यात आला.या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य बबन वाळके, शिरूर नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे, शिरूर पंचायत समिती सदस्य स्वाती घावटे, नगरसेविका सुनीता पोटे, नगरसेविका आयशा सय्यद, अखिल भारतीय मराठा महासंघ तालुका अध्यक्ष शामकांत वर्पे, अन्नापूर ग्रामपंचायत सदस्य केशव शिंदे, डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्कूलचे प्राचार्य समीर ओंकार, शीतल शर्मा तसेच शिक्षकवृंद,विद्यार्थी,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ८ कर्तृत्ववान महिलांचा ट्रॉफी, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये स्वाती घावटे, वर्षा काळे, जयश्री दांडगे, गीता आढाव, डॉ. कल्याणी सुभाष शेटे, अॅड. पल्लवी येवले, गौरी रासकर तसेच सरस्वती महिला बचत गट (रामलिंग – ओम रुद्रा कॉलनी) यांचा समावेश होता.

## एक दिवसीय टोमॅटो व्यवस्थापन व चर्चासत्र कार्यशाळेचे आयोजन

**नारायणगाव (दै. संध्या)**




राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था,तळेगाव दाभाडे आणि कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय टोमॅटो व्यवस्थापन व चर्चासत्र कार्यशाळेचे आयोजन मंगळवार दि. 10 मार्च 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर,उपबाजार आवार नारायणगाव ता. जुन्नर, जि.पुणे येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था सहाय्यक व्यवस्थापक मा. श्री. अमोल भोंग व टोमॅटो लागवड व व्यवस्थापन चर्चासत्र तज्ञ व्याख्याते मा. श्री. सुशील धुमाळ यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, अशी विनंती बाजार समितीचे सभापती संजय काळे, उपसभापती तसेच संचालक मंडळाने केली आहे.

## वाघापूर येथे महसूल अभियानात ५८१ प्रकरणांचा निपटारा

**नाझरे सुपे (दै. संध्या)**




पुरंदर तालुक्यातील वाघापूर येथे तहसीलदार कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२६ अंतर्गत महसूल शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात कुंभारवळण व राजेवाडी मंडळातील विविध महसुली तसेच शासकीय योजनांशी संबंधित एकूण ५८१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

या अभियानात फेरफार, ७/१२ दुरुस्ती, डिजिटल ७/१२, ८-अ उतारे वाटप, तुकडेबंदी निर्णय, वर्ग-२ जमिनीची प्रकरणे, भूमापन कागदपत्रे तसेच लोकसेवा हक्क कायद्यानुसार जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखले, रहिवास प्रमाणपत्र अशा विविध सेवा नागरिकांना देण्यात आल्या. याशिवाय संजय गांधी व इंदिरा गांधी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी, पीएम किसान, ई-मोजणी, अॅग्रीस्टॅक,तक्रार निवारण तसेच शिधापत्रिका संबंधित ७० प्रकरणे निकाली काढण्यात आली.

हस्तलिखित नोंदीनुसार ई-सेवा केंद्रातून उत्पन्न, रहिवासी व डोमिसाइल मिळून २२ प्रमाणपत्रे देण्यात आली. आधार कार्डची १६ ते १८ नोंदणी करण्यात आली. तसेच पर्यावरण व कृषी विभागाशी संबंधित उपक्रम, पिक विमा, पीएमएफएमई योजनेची माहिती देण्यात आली.

> "महसूल प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचवण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवले जात आहे. वाघापूर येथे मोठ्या प्रमाणावर प्रकरणे निकाली काढून नागरिकांना त्वरित सेवा देण्यात आली," असे महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

## पाटील हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दौंड (दै. संध्या)**



दौंड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, सरनोत गल्ली येथील पाटील हॉस्पिटल तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. त्यामध्ये हिमोग्लोबिन (रक्तातील हिमोग्लोबिन प्रमाण) तपासणी – 127, रक्तातील साखर तपासणी – 127, ईसीजी (हृदय तपासणी) – 90, त्वचा तपासणी व उपचार – 223, केस गळती व कोंडा उपचार – 180, तसेच चामखीळ अल्प दरात काढणे – 23 अशा तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय एकूण 226 महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या प्रसंगी दौंडच्या नगराध्यक्षा दुर्गादेवी इंद्रजित जगदाळे, माजी नगराध्यक्षा शीतलताई योगेश कटारिया, नगरसेविका रेणुका विजय थोरात, सरोज बाबलू कांबळे व उज्वला मनीष पारकले यांनी शिबिराला भेट देऊन उपस्थिती दर्शवली.

यावेळी शिबिराला उपस्थित सर्व महिलांना गुलाबाचे फूल देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच नगराध्यक्षा व नगरसेविकांचा मोगऱ्याचे व लिलीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

शिबिरादरम्यान महिलांना मोठ्या स्क्रीनवर त्वचा व केसांच्या विविध उपचार पद्धतींचे व्हिडिओ दाखविण्यात आले. यामधून आधुनिक उपचार पद्धतींबाबत माहिती देऊन महिलांना मार्गदर्शन करण्यात आले.

या आरोग्य शिबिराचे आयोजन डॉ. शिल्पा स्वप्नील पाटील व डॉ. स्वप्नील पाटील (पाटील हॉस्पिटल, दौंड) यांनी केले.

## सभापतीपदी कमल शेळकंदे तर उपसभापती अमित ढोले

**नारायणगाव (दै. संध्या)**

किल्ले शिवनेरी चे शिलेदार जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे व तालुकाप्रमुख बाबू भाऊ पाटे यांच्या नेतृत्वाखाली जुन्नर तालुका पंचायत समितीच्या सभापतीपदी कमलताई शेळकंदे व उपसभापतीपदी अमित ढोले यांची निवड झाली आहे. जुन्नर पंचायत समितीच्या सभापतीपदी कमल बाळू शेळकंदे यांनी १६ पैकी ०९ मते मिळवून सभापती पदी बाजी मारली आहे. तर उपसभापतीपदी शिवसेना (यू बी टी) चे एकमेव सदस्य अमित ढोले यांची तेवढ्याच मताने निवड झाली आहे.भाजपचे संजय व्हाडी उपसभापती पदाच्या शर्यतीत पराभूत झाले असून राष्ट्रवादीच्या आशा कैलास डावखर यादेखील पराभव झाल्या आहेत. अशा प्रकारे राज्यात सिंधुदुर्ग नंतर जुन्नर मध्ये दोन्ही शिवसेनेची अनोखी व आगळीवेगळी युती पाहायला मिळाली आहे.

दरम्यान राज्यात व केंद्रात भाजप व शिवसेना शिंदे यांची महायुती असताना भाजपचा उपसभापती होणे अपेक्षित होते. मात्र स्थानिक नेतृत्व करत असलेल्या भाजपच्या नेत्या आशाताई बुचके व आमदार शरद सोनवणे यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये सुरू असलेला राजकीय संघर्ष व राजकीय लढाई यामुळे भाजपचा उपसभापती होऊ शकला नाही अशी चर्चा सुरू आहे.

## उबेर चालकाचा खून करणाऱ्यास झाली पोलीस कोठडी

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील सितेवाडी गावच्या हद्दीतील गणेशखिंड घाटात नासिर अहम्मद सलामतुल्ला अन्सारी (वय 26,रा. ऐरोली, नवी मुंबई या उबेर चालकाचा खून करणाऱ्या आदर्श चंद्रकांत भालेराव (वय 21,रा. टिटवाळा, जि. ठाणे) या आरोपीस 8 मार्च रोजी अटक करून त्यास न्यायालयाने 12 मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती ओतूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, 5 मार्च रोजी आरोपी आदर्श भालेराव याला टिटवाळा येथून जुन्नरला जायच्या असल्या कारणाने त्याने उबेर चालक नासिर अन्सारी यांची एर्टिगा गाडी बुक केली होती. त्यानंतर ही गाडी त्याच दिवशी दुपारी तीन वाजता जुन्नरकडे निघाली असता माळशेज घाटातील गणेश खिंड परिसरात चालकाने लघुशंकेसाठी गाडी थांबवली. त्यावेळी तो चाकूच्या साहाय्याने पैशाची मागणी भालेरावकडे करू लागला.तेंव्हा दोघांमध्ये गाडीतच भांडण सुरु झाले. त्यावेळी आरोपी आदर्श भालेराव याने चालक नासिर अन्सारी यांच्याकडून चाकू हिसकावून अन्सारीवर वार करत त्यास ठार केले व त्याचा मृतदेह हा गाडीतून बाहेर काढून सितेवाडी बाजूकडील रस्त्यालगतच्या सिमेंटच्या कठड्यावरून खाली फेकून दिला. त्यानंतर आरोपी गाडी घेऊन माळशेज घाटा मार्गे टिटवाळ्याला गेला. व तिथेच गाडी सोडून फरार झाला होता.

# बारामती पंचायत समितीवर राष्ट्रवादीचे वर्चस्व

***सभापतीपदी किरण तावरे व उपसभापतीपदी शुभांगी आगवणे यांची निवड***

**बारामती (दै. संध्या)**







पुणे जिल्ह्यातील महत्वाची असणारी बारामती पंचायत समितीच्या सभापतीपदी सांगवी येथील किरण रावसाहेब तावरे यांची तर उपसभापतीपदी शुभांगी सुनिल आगवणे यांची निवड करण्यात आली.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जात असल्याने या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.किरण तावरे हे पणदरे गणातून निवडून आले आहेत तर शुभांगी आगवणे या गुणवडी गणातून भरघोस मतांनी निवडून आल्या आहेत. त्यांच्या राजकीय कामांचा अनुभव लक्षात घेत त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.बारामती पंचायत समितीच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण भागात असलेल्या विकासकामांना गती देणे महत्वाचे असणार आहे. किरण तावरे यांना यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने संजय गांधी निराधार योजना या समितीचे अध्यक्ष म्हणून तसेच त्यांच्या पत्नी मिनाक्षी किरण तावरे यांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून कार्यरत होत्या. त्यांना राजकारणाचा अनुभव असल्यामुळे ही जबाबदारी दिल्याचे म्हणले जात आहे.बारामती पंचायत समितीच्या या निवडी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचनेनुसार करण्यात आल्या आहेत.या निवडींमुळे बारामती तालुक्यातील राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

सभापती निवड झाल्यानंतर किरण तावरे यांनी बारामती तालुक्यातील ग्रामीण भागांत विकासकामांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. पंचायत समितीच्या माध्यमातून शेतकरी,महिला, युवकांसाठी विविध योजना राबविणार असल्याचे सांगितले.पंचायत समितीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या अडी-अडचणी,समस्या सोडविण्यावर भर देणार असल्याचे नुतन सभापती किरण तावरे यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### शेतकऱ्यांच्या दोन लाख पर्यंतच्या कर्जमाफीच गोडबंगाल!

चंद्रपूर (दैनिक संध्या) : शेतकऱ्यांना दोन लाख पर्यंत कर्जमाफी जाहीर केली आणि नेमकी मेक "३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले कर्जदार असावे" ३० सप्टेंबर पर्यंत किती शेतकरी थकीत आहे तर नेमके चार दोन टक्के जे की मयत असेल किंवा अन्य कारणाने. बरं मयत असणाऱ्या कर्जदाराचा फक्त मृत्यूचा दाखला घेऊन हे कर्ज माफ करणार नाही त्यातही त्याच्या कर्जाची हमी स्वतःवर घेणारा आप्त किंवा वारसाने स्टॅम्प पेपरवर नोटरीद्वारा शपथपत्र करून,अशा वारसाच्या नावे शेती असावी व त्या शेतीवर कर्ज नसावं,बिना कर्जाची फार्मर ID हवी. शेतीवर कर्ज नसलेला वारस त्या मयत शेतकऱ्याचा कर्जबोजा स्वतः घेणारा कुठे भेटेल बरं,शेती असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यावर पीक कर्ज असणारच यात कुणाचंही दुमत नसाताना अशा अटी लादल्या त्यामुळे हे मयत शेतकऱ्याच्या टाळुवरचच लोणी खाण नव्हे का?.असा शेती असून कर्ज नसलेला कोण वारस मयत शेतकऱ्याला मिळेल बरं या वरून मयत थकीत शेतकऱ्यांनाही कर्जमाफी मिळेल याची शाश्वती नाही. हयात शेतकऱ्याला ३१ मार्च च्या आत काहीही करून गाय बैल शेळ्या मेंढ्या बायकोच्या गळ्यातलं विकून पीक कर्ज भराव लागते तरच पुढील हंगामासाठी कर्ज मिळून त्याची शेती होऊ शकते त्यामुळे ९८/९९ टक्के शेतकरी हे नियमित कर्ज भरणारेच आहे त्यात त्यांना या दोन लाखाच्या कर्जमाफीचा किती लाभ होणार बरं ? खुप तर नियमित कर्जदाराला पन्नास हजाराच अनुदान सरकार देईल,पण दोन लाखाचा मात्र गाजावाज्या ह्या सरकारकडून होणार,कर्जमाफी जाहिरातीवर शेतकऱ्याच्या कर्जमाफीच्या रकमपेक्षाही जास्त खर्च हे करणार! उदधोगपतीच्या अरोबो खरोबो कर्जमाफीची मात्र कुणाला भनक सुद्धा लागू देणार नाही अशाप्रकारे रात्रंदिवस कष्ट उपसून अत्यल्प दरात जनतेची भूक भागवणाऱ्या अशा या शेतकऱ्याच्या कर्जमाफीची हे सरकार थट्टाच करणार हे मात्र नक्की ! सरकारच्या अशा कुटनितिमुळे शेतकऱ्यांनी या कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी नियमित कर्जदाराचा थकीत कर्जदार होणंच योग्य राहील अशी शेतकऱ्यात चर्चा दिसून येत आहे.

### आणखी दोघींचा मृत्यू; 22 वर पोहोचली मृत कामगारांची संख्या

नागपूर (दैनिक संध्या) : काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील 'एसबीएल कंपनी लिमिटेड'मध्ये १ मार्च रोजी झालेल्या भीषण स्फोटातील जखमींच्या मृत्यूचे सत्र सुरूच आहे. उपचाराखाली असलेल्या दोन जखमी महिलांचा मृत्यू झाला. मृतांची संख्या आता २२वर पोहोचली असून, सध्याच्या स्थितीत ऑरेंज सिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे १४ महिला उपचार घेत असून, दोन महिला व्हेंटिलेटरवर आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते. आम्रपाली काळसर्पे (वय ३६, रा. राऊळगाव, ता. काटोल) यांचा उपचारादरम्यान ७ मार्च रोजी रात्री ११:०० वाजताच्या दरम्यान मृत्यू झाला. त्या ५५ टक्के जळाल्या होत्या. त्या पहिल्या दिवसापासून व्हेंटिलेटरवर होत्या, तर रोशनी सूर्यकांत उमाठे (वय ३२, रा. दुधाळा) यांचा ८ मार्च रोजी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास मृत्यू झाला. त्या ७५ टक्के जळाल्या होत्या. त्यांच्या हाताला गंभीर फ्रैक्चर होते, पायांवर शस्त्रक्रिया करून 'एक्सटर्नल फिक्सेशन' करण्यात आले होते. सध्या गंभीर रुग्णांमध्ये सुजाता विनायक रक्षीत (३५) व सीमा विजय धुर्वे (२७) दोन्ही ७० टक्के, ज्योती शामू धुर्वे (२१ वर्षे) ६५ टक्के जळाल्या असून, या तिन्ही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याचे बोलले जाते. सध्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या दुर्गा मनोज घाटगे ६० टक्के, उषा बालाजी रेवतकर ५० टक्के, मयुरी धुर्वे ४५ टक्के, मनीषा धुर्वे ४५ टक्के, काजल कोरती व रितू सलाम प्रत्येकी ४० टक्के, कविता उईके ३५ टक्के, सुनीता उईके ३० टक्के आणि वैशाली धुर्वे १५ टक्के जळाल्या असून, त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अल्प जखमींमध्ये वैशाली सटई आणि रोशनी मसराम असून, दोन्ही ५ टक्के भाजल्या आहेत. त्यांच्यावर वैद्यकीय देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.

### महाराष्ट्र होरपळणार! मुंबई-ठाण्यासह कोकणात 'तीव्र उष्णतेची लाट'

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात उन्हाचा कडाका आता असह्य होऊ लागला आहे. हवामान विभागाने पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांसाठी 'तीव्र उष्णतेच्या लाटेचा' इशारा जारी केला असून ९ आणि १० मार्च हे दोन दिवस अत्यंत कठीण राहण्याची शक्यता आहे. एकीकडे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात दमट हवामानामुळे नागरिक हैराण होणार असतानाच, सिंधुदुर्ग, कोल्हापूर-सांगली भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये ९ मार्च रोजी 'उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट' येण्याची ५१ ते ७५% शक्यता आहे. १० मार्च रोजी देखील या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट कायम राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड: या जिल्ह्यांत ९ मार्च रोजी 'तीव्र उष्णतेची लाट' येण्याची शक्यता आहे. १० मार्च रोजी देखील येथे उष्णतेची लाट कायम राहील. रत्नागिरी: येथे ९ आणि १० मार्च रोजी हवामान अत्यंत उष्ण आणि दमट असेल. सिंधुदुर्ग: ९ मार्च रोजी येथे हलक्या पावसाची शक्यता असून त्यानंतर हवामान कोरडे राहील. उत्तर महाराष्ट्र: उष्ण आणि दमट हवामान धुळे आणि नंदुरबार: ९ मार्च रोजी येथे उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. जळगाव: ९ आणि १० मार्च अशा दोन्ही दिवशी येथे उष्ण आणि दमट हवामान असेल.

### एका 'डेटा लिक'ने लाखोंना धोका; सायबर ऑडिट गरजेचे ! सतर्क होण्याची गरज

नागपूर (दैनिक संध्या) : 'सबकुछ ऑनलाईन'च्या युगात सरकारी सेवा, कागदपत्रे आणि नागरिकांचा वैयक्तिक डेटा मोठ्या प्रमाणात डिजिटल स्वरूपात साठवला जात आहे. त्यामुळे देशातील डिजिटल पायाभूत सुविधा आणि ऑनलाइन सेवांवरील सायबर धोक्यांचे प्रमाणही वाढले आहे. एका लहानशा 'डेटा लिक' मुळे लाखो नागरिकांना मोठा फटका बसू शकतो व त्यामुळेच सायबर सुरक्षेचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. केंद्र सरकारने सरकारी संस्था आणि महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी नियमित सायबर सुरक्षा ऑडिट अनिवार्य केले आहे. मात्र, काही विभागांत याबाबत औपचारिकतेवरच भर देण्यात येतो. खासगी क्षेत्रांप्रमाणे सरकारी विभागांनीदेखील यासंदर्भात विशेष सतर्कता दाखवण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारच्या धोरणानुसार 'सर्ट-इन' (इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम) व 'एनसीआयआयपीसी' (नॅशनल क्रिटिकल इन्फॉर्मेशन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोटेक्शन सेंटर) या संस्था देशातील डिजिटल पायाभूत सुविधांच्या सुरक्षेवर देखरेख ठेवतात. जुलै २०२५ मध्ये 'सर्ट इन'ने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सरकारी संस्था तसेच महत्त्वाच्या पायाभूत क्षेत्रांमध्ये दरवर्षी किमान एकदा सायबर सुरक्षा ऑडिट करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी देशभरातील २३७ माहिती सुरक्षा ऑडिट संस्थांना मान्यता देण्यात आली आहे.

# नाईट फ्रँक इंडियाकडून पुणे वेअरहाऊसिंग रिपोर्ट सादर

पुणे (दै. संध्या)

नाईट फ्रँक इंडियानुसार, चाकण आणि तळेगाव मधील विद्यमान मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टमची सखोलता आणि तयार पायाभूत सुविधा,कौशल्यवान कामगारांची उपलब्धता आणि पुरवठादार नेटवर्कसह स्थापित स्थानांसाठी ओक्युपायर्सची प्राधान्यामुळे चाकण–टाळेगाव बॅल्टने पुण्यातील प्रमुख वेअरहाऊसिंग आणि औद्योगिक हब म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. या बॅल्टचा एकूण लीजिंग व्हॉल्यूममधील हिस्सा २०२४ मध्ये ६६% वरून २०२५ मध्ये ८०% पर्यंत वाढला. त्याच्या तुलनेत, वाघोली –रांजणगाव कॉरिडॉरमध्ये २०२४ मधील २९% वरून २०२५ मध्ये ट्रान्झॅक्शनचा हिस्सा ५% पर्यंत घटला, कारण ओक्युपायर्सचे क्रियाकलाप पुन्हा चाकण-प्रमुख क्लस्टर्सकडे वळले. शेष १५% हिस्सा परिधीय स्थळांनी घेतला, जो मुख्यतः निवडक मॅन्युफॅक्चरिंग गरजांमुळे चालवला गेला.

मजबूत ऑटोमोटिव्ह इकोसिस्टम, सुधारत असलेली पायाभूत सुविधा आणि सातत्यपूर्ण संस्थात्मक डेव्हलपर सहभागामुळे पुणे भारतातील प्रमुख वेअरहाऊसिंग बाजारांपैकी एक म्हणून स्थिर झाले आहे. नाईट फ्रँक इंडिया, आंतरराष्ट्रीय प्रॉपर्टी कन्सल्टन्सीच्या ताज्या वेअरहाऊसिंग रिपोर्टनुसार, पुण्याने देशातील २१ (८ प्राथमिक आणि १३ गौण) बाजारांमध्ये सर्वाधिक वेअरहाऊसिंग लीजिंग व्हॉल्यूम नोंदवले. शहरातील लीजिंग व्हॉल्यूम वर्षागणिक ८६% वाढून २०२४ मधील ८.६ दशलक्ष चौरस फूट वरून २०२५ मध्ये १६.० दशलक्ष चौरस फूट झाला. ८ प्रमुख बाजारांमध्ये पुण्याचा हिस्सा २२% होता आणि एकूण २१ बाजारांमध्ये १९% होता. २०२५ मध्ये वेटेड सरासरी ट्रान्झॅक्टेड भाडे वर्षागणिक ३% वाढले. चाकण– तळेगाव बॅल्टमध्ये ग्रेड A मालमत्तांसाठी भाडे ₹२५–३३/चौरस फूट/महिना होते. रांजणगाव आणि वाघोली तुलनेने स्वस्त पर्याय देतात, जिथे ग्रेड A भाडे ₹२०–२५/चौरस फूट दरम्यान आहे. मॅन्युफॅक्चरिंगने ओक्युपायर्सच्या क्रियाकलापांवर प्रभुत्व राखले, २०२५ मध्ये एकूण लीजिंगमध्ये ७७% योगदान दिले, ज्यात पुण्यातील वेअरहाऊसिंग व्यवहारांचा १२.३६ दशलक्ष चौरस फूट हिस्सा होता. मॅन्युफॅक्चरिंग-केंद्रित वेअरहाऊसिंग लीजिंग व्हॉल्यूम वर्षागणिक सुमारे ८०% ने वाढले, २०२४ मध्ये ६.८७ दशलक्ष चौरस फूट वरून, ज्यामध्ये हुंदाई ट्रान्सिस (Hyundai Transys), लिअर ऑटोमोटिव्ह (Lear Automotive), एसकेएस फास्टनर्स (SKS Fastners) आणि टाटा ऑटोकॉम्प (Tata AutoComp) सारख्या ऑटोमोटिव्ह आणि अभियांत्रिकी कंपन्यांनी सक्रिय जागा घेतली.

पी विलास, नॅशनल डायरेक्टर, ऑक्युपायर स्ट्रॅटेजी अँड सोल्यूशन्स, कॅपिटल मार्केट्स आणि इंडस्ट्रियल अँड लॉजिस्टिक आणि ब्रँच हेड – पुणे, यांच्या मते, "पुण्यातील वार्षिक वेअरहाउसिंग ट्रॅक्शन व्हॉल्यूममध्ये झालेल्या प्रचंड वाढीच्या अनेक कारणांपैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे, व्यापाऱ्यांनी त्यांचे कामकाज मोठ्या आणि एकात्मिक (integrated) सुविधांमध्ये एकत्रित केले आहे. यामुळे व्यवहारांचा सरासरी आकार (average deal size) वाढला असून मुख्य औद्योगिक क्लस्टर्समध्ये मोठ्या प्रमाणात जागा घेतली गेली आहे. पुण्याची औद्योगिक आणि वेअरहाउसिंग बाजारपेठ ही प्रामुख्याने उत्पादन (manufacturing) क्षेत्रावर आधारित राहण्याची अपेक्षा आहे. याला ऑटोमोटिव्ह आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील निरंतर भांडवली खर्च, सातत्यपूर्ण संस्थात्मक विकास, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि एक्सप्रेसवे कनेटिव्हिटीमुळे पाठबळ मिळत आहे. चाकण–तळेगाव पट्टा या वाढीचा केंद्रबिंदू राहील आणि आजूबाजूच्या क्लस्टर्समध्ये हळूहळू वाढीव मागणी विभागली जाईल, ज्यामुळे बाजाराचा विस्तार कायम राहील."

## नद्यांतून वाहतेय पाणी की विष? जलप्रदूषणात महाराष्ट्र अव्वल

नागपूर (दै. संध्या)

जीवनदायिनी असलेल्या नद्यांमधील पाण्याचा प्रवाह औद्योगिकीकरणाचा हव्यास आणि शासन व प्रशासनाच्या कमालीच्या दुर्लक्षित धोरणांमुळे विषारी झाला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२५ च्या अहवालानुसार देशभरातील ६२३ प्रमुख व मोठ्या नद्यांच्या अभ्यासाअंती २७१ नद्यांमध्ये २९६ प्रदूषित पट्टे आढळून आले आहेत. यात महाराष्ट्रातील ५४ तर विदर्भातील सात प्रमुख नद्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या सर्व नद्यांचे पाणी विविध शहरांसह छोट्या-मोठ्या गावांना पिण्यासाठी पुरविण्यात येते. या नद्यांच्या पाण्यात विविध घातक रसायने मिसळली जात असून, ती जलशुद्धीकरणात पूर्णपणे नष्ट होत नसल्याने त्यांचा मानवी आरोग्यावर आजारांच्या रूपाने वाईट परिणाम दिसून येत आहे. शिवाय, त्या नद्यांमधील जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे. प्रदूषण ओळखण्यासाठी पाण्यातील बीडीओ (बायोकेमिकल ऑक्सिजन डिमांड) आणि सीओडी (केमिकल ऑक्सिजन डिमांड) चे प्रमाण मोजले जाते.

## iQOO Z11x १२ मार्चला लॉन्च; दमदार बॅटरी आणि उच्च कार्यक्षमता

नवी दिल्ली(दै. संध्या)




हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँड iQOO १२ मार्च रोजी आपला नवीन स्मार्टफोन iQOO Z11x लॉन्च करण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थ्यांच्या वेगवान आणि बहुपयोगी जीवनशैलीचा विचार करून हा स्मार्टफोन विशेषतः डिझाइन करण्यात आला आहे.

कॉलेजमधील लेक्चर्स, ग्रुप प्रोजेक्ट्स, कोडिंग असाइनमेंट्स, ऑनलाइन क्लासेस आणि संशोधन यांसोबतच गेमिंग, स्ट्रीमिंग आणि सोशल मीडियासाठी दीर्घकाळ टिकणारा फोन विद्यार्थ्यांना आवश्यक असतो. या गरजांना लक्षात घेऊन iQOO Z11x मध्ये दमदार परफॉर्मन्स आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी देण्यात आली आहे.

या स्मार्टफोनची सर्वात मोठी खासियत म्हणजे सेगमेंटमधील सर्वात मोठी 7200 mAh बॅटरी. कंपनीच्या माहितीनुसार, एका चार्जवर सुमारे ४० तास व्हिडिओ प्लेबॅक, ९३ तास म्युझिक प्लेबॅक, १५.४ तास गेमिंग आणि १८.७ तास सोशल मीडिया वापर शक्य होतो. यासोबत 44W फ्लॅशचार्ज, रिव्हर्स चार्जिंग सपोर्ट आणि ६ वर्षांपर्यंत बॅटरी हेल्थ यांसारखी वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत.


परफॉर्मन्ससाठी या फोनमध्ये MediaTek Dimensity 7400 Turbo प्रोसेसर देण्यात आला असून तो १० लाखांहून अधिक AnTuTu बेंचमार्क स्कोअर देतो. तसेच डिव्हाइसला २ वर्षांचे OS अपडेट्स आणि ४ वर्षांचे सिक्युरिटी अपडेट्स मिळणार आहेत.

स्मार्टफोनमध्ये मिलिटरी-ग्रेड प्रोटेक्शनसह IP68 आणि IP69+ डस्ट व वॉटर रेसिस्टन्स देण्यात आले आहे. त्यामुळे पडणे, पाणी सांडणे किंवा पावसात फोन वापरणे अशा परिस्थितीतही फोन सुरक्षित राहतो.

फोटोग्राफीसाठी फोनमध्ये ५० मेगापिक्सेल Sony AI कॅमेरा देण्यात आला असून फ्रंट आणि रियर दोन्ही कॅमेऱ्यावर 4K व्हिडिओ रेकॉर्डिंगचा सपोर्ट आहे. त्यामुळे कॅम्पसवरील क्षण टिपणे, प्रेझेंटेशन रेकॉर्ड करणे किंवा सोशल मीडियासाठी कंटेंट तयार करणे सोपे होते.

'Make in India' उपक्रमाअंतर्गत iQOO Z11x चे उत्पादन vivo च्या ग्रेटर नोएडा येथील उत्पादन केंद्रात केले जाणार आहे. तसेच ग्राहकांना देशभरातील ६७० हून अधिक सर्व्हिस सेंटर्सचे नेटवर्क उपलब्ध असणार आहे.

## सर्वसमावेशक कॅन्सर व बर्न सेवांचा शुभारंभ



कार्यक्रमानंतर उपस्थित पाहुण्यांनी नव्याने सुरू करण्यात आलेल्या सुविधांची पाहणी केली. त्यानंतर उपस्थितांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

पुणे (दै. संध्या)

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, भोसरी येथे अत्याधुनिक सर्वसमावेशक कॅन्सर व बर्न सेवांचा आज औपचारिक शुभारंभ करण्यात आला. इंद्रायणी नगर, भोसरी येथील रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत या सेवांचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भोसरीचे आमदार महेश दादा लांडगे उपस्थित होते. तसेच पिंपरी-चिंचवड चारोळी मोशी हाउसिंग सोसायटी असोसिएशनचे प्रतिनिधी संजीवन सांगळे आणि प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते व पद्मश्री पुरस्कार विजेते गिरीश प्रभुणे हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. नवीन सुरू करण्यात आलेल्या या सेवांद्वारे कॅन्सर तसेच गंभीर भाजलेल्या रुग्णांसाठी निदान, शस्त्रक्रिया, अतिदक्षता उपचार, पुनर्वसन आणि दीर्घकालीन उपचार अशा सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमच्या माध्यमातून रुग्णांना दर्जेदार व वेळेवर उपचार मिळावेत हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले की, पिंपरी-चिंचवड आणि उत्तर पुणे परिसरातील नागरिकांसाठी अशा प्रकारच्या अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कॅन्सर आणि भाजलेल्या रुग्णांवर वेळेवर व तज्ज्ञ उपचार झाल्यास रुग्णांच्या आरोग्य सुधारण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते, असे त्यांनी नमूद केले.

रुग्णालय प्रशासनाने सांगितले की, या नव्या सेवांमुळे परिसरातील रुग्णांना प्रगत उपचारांसाठी दूर जाण्याची गरज भासणार नाही आणि उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील.

## इंटेरिओ बाय गोदरेजचा प्रोजेक्ट्स व्यवसाय आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १,१०० कोटींच्या टप्प्यावर

मुंबई (दै. संध्या)

गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपच्या इंटेरिओ बाय गोदरेज या अग्रगण्य फर्निचर ब्रँडच्या प्रोजेक्ट्स व्यवसायाचा महसूल बँकिंग, कॉर्पोरेट, पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक क्षेत्रांमध्ये टर्नकी वर्कस्पेस सोल्यूशन्ससाठी वाढती मागणी या आधारावर आर्थिक वर्ष 26 मध्ये 1,100 कोटी रु. पार करण्यासाठी सज्ज आहे. ब्रँडने अलीकडेच मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थानिक मुख्यालयासाठी चार मजल्यांवर पसरलेल्या 75,000 चौ.फुट क्षेत्रफळाच्या टर्नकी इंटीरियर फिट-आउट प्रकल्पाची पूर्तता केली आहे. या प्रकल्पात भारतातील सर्वात मोठी डीलिंग रूम असून बँकेच्या महत्त्वाच्या ट्रेझरी आणि गुंतवणूक कामकाजाला पाठबळ देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या सर्वसमावेशक टर्नकी अंमलबजावणीत वैशिष्ट्यपूर्ण सीलिंग सिस्टिम्स, मॉड्युलर पार्टिशन्स, संपूर्ण मॉड्युलर फर्निचर, एव्ही वर्क्स आणि फायर रेटेड स्टोरेजेस यांचा समावेश आहे. साधन स्त्रोत यांचे अनुकूलन, प्रक्रियेत सुधारणा आणि अत्यंत समर्पित तरुण व्यावसायिकांच्या टीममुळे या उच्च आव्हानात्मक कामाचे हस्तांतरण झाल्यावर त्याला ग्राहकाकडून मोठी प्रशंसा मिळाली आहे. इंटेरिओ येत्या आर्थिक वर्षामध्ये 1500 कोटी महसूलाचा शाश्वत दृष्टीकोन साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. प्रोजेक्ट्स व्यवसाय देशभरातील अनेक विश्वासार्ह भागीदारांसह आपली क्षमता वाढविण्यासाठी आणि ऑफलाइन वर्कफ्लोचे डिजिटल सक्षमकरण करून विविध क्षेत्रांमध्ये उच्च दर्जाचे आणि वेळेत प्रकल्प वितरित करण्यासाठी जलद गतीने पुढे जात आहे. उद्योगातील अंतर भरून काढण्यासाठी व्यवसायाने आपल्या कामाअंतर्गत अनेक उपक्रम सुरू केले असून त्यांना प्रायोजकत्वही दिले आहे. त्यामध्ये सर्व भागधारकांमध्ये पारदर्शकता आणि अखंड संवाद वाढवण्यासाठी एआय च्या मदतीने सक्षम केलेली डिजिटल पद्धतीची कार्यपद्धती ProGenXT चा समावेश आहे. या भागीदारीबाबत बोलताना इंटेरिओ बाय गोदरेजचे EVP आणि बिझनेस हेड स्वप्नील नगरकर म्हणाले, "भारतीय बँकिंग उद्योगाने मजबूत आर्थिक विस्तार, वाढते वापरण्यायोग्य उत्पन्न, वाढता ग्राहकवाद आणि सुलभ क्रेडिट उपलब्धता यामुळे ठोस वाढ अनुभवली आहे.

## आंबा नुकसानाच्या वस्तुस्थितीचा विस्तृत अहवाल पाठवा : उदय सामंत

रत्नागिरी (दै. संध्या)

गतवर्षीपेक्षा यावर्षी ८० टक्के कमी आंबा उत्पादन होत असल्याने याबाबतीतील कारणांसह तालुकानिहाय वस्तुस्थितीचा विस्तृत अहवाल शासनाकडे पाठवावा. आंबा बागायतदारांसाठी जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मंत्रालयात बैठक घेऊन प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले. रत्नागिरी जिल्हा आंबा बागायतदार यांच्या अडीअडचणी संदर्भात मंत्री सामंत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी बैठक आयोजित केली होती. या बैठकीला आमदार किरण सामंत, जिल्हाधिकारी मनुज जिंदल, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले, जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक दर्शन कानसे, माजी नगराध्यक्ष राहुल पंडित, स्वीकृत नगरसेवक प्रदीप उर्फ बंड्या साळवी तसेच आंबा बागायतदार उपस्थित होते. कृषी विभाग आणि कोकण कृषी विद्यापीठाने दिलेल्या संयुक्त अहवालात प्रदीर्घ दव व थंडीमुळे मोहर काळा पडला, नर मोहरांचे प्रमाण वाढले, तुडतुडा, फुलकिडीमुळे गतवर्षी पेक्षा चालूवर्षी ८० टक्के आंबा उत्पादन कमी झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी दिली. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, पणनमंत्री जयकुमार रावल तसेच कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या समवेत लवकरच बैठक आयोजित करून त्यामध्ये जिल्ह्यातील आंबा काजू बागायतदारांचे प्रश्न मार्गी लावण्यासह त्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

# भारत-इंग्लंड उपांत्य सामन्याने डिजिटल प्रेक्षकसंख्येचा जागतिक विक्रम

मुंबई (दै. संध्या)



क्रीडा, प्रसारमाध्यमे आणि स्ट्रीमिंगच्या क्षेत्रात आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक 2026 ने नवे जागतिक बेंचमार्क प्रस्थापित केले आहेत. 5 मार्च रोजी झालेल्या भारत विरुद्ध इंग्लंड उपांत्य सामन्याने डिजिटल प्रेक्षकसंख्येचा ऐतिहासिक टप्पा गाठला.

भारतातील आघाडीच्या स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म जिओहॉटस्टारवर या सामन्यादरम्यान तब्बल 65.2 दशलक्ष समकालीन प्रेक्षक नोंदले गेले. कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर लाइव्ह इव्हेंटसाठी नोंदवली गेलेली ही आतापर्यंतची सर्वाधिक प्रेक्षकसंख्या ठरली आहे. या सामन्याला जिओहॉटस्टारवर एकूण 619 दशलक्ष व्ह्यूज मिळाले, ज्यामुळे तो आतापर्यंतचा सर्वाधिक स्ट्रीम झालेला टी-20 आंतरराष्ट्रीय सामना ठरला. दोन्ही डावांत मिळून 499 धावा झालेल्या या थरारक सामन्याने भारतासह जगभरातील क्रिकेट चाहत्यांना मंत्रमुग्ध केले. मुंबईत झालेल्या या सामन्याने नोव्हेंबर 2024 मध्ये एका आंतरराष्ट्रीय स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मने नोंदवलेल्या 65 दशलक्ष प्रेक्षकांच्या आधीच्या विक्रमालाही मागे टाकले. विशेष म्हणजे तो विक्रम विविध बाजारपेठांतील एकत्रित प्रेक्षकसंख्येमुळे झाला होता, तर जिओहॉटस्टारचा विक्रम एका सामन्यावर आधारित आहे.

या उपांत्य सामन्याने भारतीय संघाची प्रचंड लोकप्रियता, निर्णायक सामन्याचा रोमांच आणि चाहत्यांचा उत्साह यांचे प्रतीक म्हणून आयसीसी स्पर्धेची वाढती लोकप्रियता अधोरेखित केली.

लिनियर टेलिव्हिजन आणि डिजिटल अशा दोन्ही प्लॅटफॉर्मवर या सामन्याला 320 दशलक्षांहून अधिक प्रेक्षकांनी पाहिले. तर एकूण स्क्रीन टाइम 23 अब्ज मिनिटांपेक्षा अधिक नोंदवला गेला, ज्यामुळे हा सामना टी-20 आंतरराष्ट्रीय इतिहासातील सर्वाधिक पाहिला गेलेला सामना ठरला.

आयसीसीचे अध्यक्ष जय शाह म्हणाले, "भारत-इंग्लंड उपांत्य सामन्यादरम्यान नोंदवलेली प्रेक्षकसंख्या क्रिकेटप्रेमींच्या उत्साहाचे द्योतक आहे. हा खेळ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यात झालेली प्रगतीही यावरून दिसून येते. हा विश्वचषक मैदानावरील खेळाबरोबरच लाखो चाहत्यांच्या सहभागामुळेही लक्षात राहील."

जिओस्टारचे उपाध्यक्ष उदय शंकर म्हणाले, "हा विक्रम जिओस्टारच्या तांत्रिक आणि सर्जनशील क्षमतेचे तसेच क्रिकेट अधिक व्यापक करण्याच्या आयसीसीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. दर तीनपैकी एक भारतीय प्रेक्षकाने हा उपांत्य सामना पाहिला. इतक्या मोठ्या प्रमाणातील प्रेक्षकांना अखंड अनुभव देण्यासाठी तंत्रज्ञानाचा सर्वोत्तम वापर आवश्यक असतो."

सामन्यादरम्यान नोंदवलेल्या 619 दशलक्ष व्ह्यूजने 2024 च्या आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक अंतिम सामन्यादरम्यान नोंदवलेल्या 533 दशलक्ष व्ह्यूजचा विक्रमही मागे टाकला.

अंतिम सामना अद्याप बाकी असतानाच आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक 2026 ने डिजिटल आणि ब्रॉडकास्ट प्लॅटफॉर्मवर अनेक नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत.

या स्पर्धेचा अंतिम सामना 8 मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणार असून प्रेक्षकांना हा सामना जिओहॉटस्टार आणि स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर थेट पाहता येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जागतिक महिला दिनानिमित्त पद नियुक्ती पत्र वाटप व चर्चासत्र कार्यक्रम संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : आज दिनांक 8 मार्च "अंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त" महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनिवासी भारतीय (NRI) विभाग द्वारा पुणे जिल्हा व महाराष्ट्र राज्य पातळीवर महिला सेलचे पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र वाटपाचा कार्यक्रम हॉटेल रविराज भांडारकर रोड डेक्कन पुणे येथे आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित नगरसेवक व स्थायी समिती सदस्य, माजी महापौर प्रशांत जगताप ह्यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. या वेळी अनिवासी भारतीय विभागाच्या अध्यक्षा विद्या कदम, कार्याध्यक्ष व प्रभारी डॉ, मॅन्युअल डिसूझा व उपाध्यक्ष ॲड. धनंजय बुद्धिवंत यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाले. राज्य महिला अध्यक्ष सुवर्णा माने, राज्य महिला उपाध्यक्ष ॲड. रेखा माने, राज्य महिला सचिव मेघा शेगर, पुणे जिल्हा महिला अध्यक्ष मुमताज शेख यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी सेक्रेटरी राष्ट्रपती पदक सम्मानित निवृत्त पोलीस निरीक्षक आनंद जंगम, वरिष्ठ उपाध्यक्ष निक्सन ऑगस्टीन, उपाध्यक्ष केनेत रेमी,अर्चना शहा, उपाध्यक्षा अलिशा बुद्धिवंत, जनरल सेक्रेटरी मिस सोनिया आगा, खजिनदार सौ विनीता जाधव, जॅकलीन फॉरेस्टर, मनिषा ढवले, बळीराम चव्हाण, सौ मन्दाकिनी खरात, अनिल कस्बे, कवी बाळासाहेब जाधव, पत्रकार शंकर जोग व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी विद्या कदम म्हणाल्या अनिवासी भारतीय नागरिक शिक्षण नोकरी किंवा व्यवसायासाठी भारताबाहेर राहतात त्यांच्या रक्षणासाठी अखिल भारतीय काँग्रेस कमिटी एनआरआय अनिवासी भारतीय बाहेर देशात राहणारे त्यांना काँग्रेस पक्षात जोडणे त्यांच्या अडीअडचणी व समस्यांचे समाधान करणे.

### खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भानुदास पऱ्हाड



आळंदी (दैनिक संध्या) : खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी पत्रकार भानुदास पऱ्हाड यांची एकमताने निवड करण्यात आली. चाकण येथे माजी अध्यक्ष कोंडीभाऊ पाचारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी उपस्थित पत्रकारांनी नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी रुपेश बुट्टे पाटील, सिद्धेश कर्नावट व तुषार मोढवे यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी तुकाराम बोंबले, तर कार्याध्यक्षपदी राजेंद्र मांजरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहसचिवपदी शरद भोसले, सहकार्याध्यक्षपदी आदेश टोपे व विजय मुऱ्हे, कोषाध्यक्षपदी रत्नेश शेवकरी, सहकोषाध्यक्षपदी अशोक टिळेकर व कुंडलिक वाळुंज, प्रसिद्धी प्रमुखपदी गणेश आहेरकर, तर सोशल मीडिया प्रमुखपदी प्रफुल्ल टंकसाळे यांची निवड झाली. याशिवाय सल्लागार म्हणून कोंडीभाऊ पाचारणे, एकनाथ सांडभोर, अविनाश दुधावडे, राजेंद्र सांडभोर, नंदकुमार मांदळे, ए. पी. शेख, गणेश फलके यांची निवड करण्यात आली. कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. निलेश कड पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून सदस्य म्हणून सतीश सांगळे व संतोष फडके आदी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष भानुदास पऱ्हाड यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, “खेड तालुक्यातील सर्व पत्रकारांना एकत्रित व्यासपीठ मिळावे, त्यांच्या अडचणी व प्रश्न सोडवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येतील. पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सन्मानासाठी संघटना अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करू. सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने खेड तालुका पत्रकार संघ अधिक प्रभावीपणे कार्य करेल,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शिरूर पंचायत समितीच्या सभापती स्वाती घावटे तर उपसभापतीपदी रामभाऊ सासवडे

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वाती घावटे यांची तर उपसभापतीपदी रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीत विरोधी उमेदवारांनी माघार घेतल्याने ही निवड बिनविरोध झाली. मागील महिन्यात झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने आघाडी घेत ८ जागांवर विजय मिळवला होता. तर भारतीय जनता पक्षाला ५ जागा मिळाल्या असून एक अपक्ष सदस्य निवडून आला आहे. पंचायत समितीच्या एकूण १४ जागा आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्रितपणे लढवल्या होत्या. यंदा पंचायत समितीच्या सभापतीपदासाठी ओबीसी महिला प्रवर्गाचे आरक्षण होते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्वाती घावटे यांनी सभापतीपदासाठी तर रामभाऊ सासवडे यांनी उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दरम्यान भारतीय जनता पक्षाकडून सभापतीपदासाठी मनीषा सतीश पाचंगे तर उपसभापतीपदासाठी सागर देवकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीत पाचंगे आणि देवकर यांनी माघार घेतल्याने स्वाती घावटे व रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.पंचायत समिती सभापतीपदी स्वाती घावटे तर उपसभापतीपदी रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी घोषित केले.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महेश डोके यांनी काम पाहिले. या निवडीमुळे शिरूर पंचायत समितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व कायम राहिले आहे.स्वाती घावटे या शिरूर ग्रामीण पंचायत समिती गणातून निवडून आल्या आहेत तर रामभाऊ सासवडे हे शिक्रापूर पंचायत समिती गणातून निवडून आले आहेत.

### शरदचंद्र पवार कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विज्ञान प्रकल्प स्पर्धेत केले यश संपादन

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील खोडद येथे पार पडलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेत ओतूर येथील शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या एआय अँड एमएल विभागातील ओम अहिरे, पृथ्वीराज जुंदरे,चेतन शेवाळे व सोहम सुंकी या विद्यार्थ्यांनी 'टीच कनेक्ट' या अभिनव प्रकल्पासाठी तृतीय क्रमांक पटकाविला. एआय अँड एमएल अभियांत्रिकी शाखेची ही पहिलीच बॅच असून, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत मिळवलेले हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद मानले जात आहे.विद्यार्थ्यांना या प्रकल्पासाठी पल्लवी घोलप व सुमित लोहटे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे,मानद सचिव वैभव तांबे, प्राचार्य डॉ. जी. यू.खरात,सुनील खताळ,नीता बानखले,सिद्धेश पानसरे, विशाल बेनके, सचिन जाधव, पूजा घोलप व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ममता बाल सदनमध्ये महिला कर्मचाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन सेवेला सलाम

सासवड (दै. संध्या)

- संस्थेच्या अध्यक्षांनीच केला १०० जणांचा स्वयंपाक
- स्वयंपाकी महिला कर्मचाऱ्यांना एक दिवसाची सुट्टी
- महिला दिनी ‘ममता’ची अनोखी दाद



जागतिक महिला दिनानिमित्त महिलांविषयी आदर, कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त करण्याचा आगळावेगळा उपक्रम ‘अनाथांची माई’ पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे राबविण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष दिपक दादा गायकवाड यांनी स्वयंपाकी महिला कर्मचाऱ्यांना एक दिवसाची सुट्टी देत स्वतः स्वयंपाक करून त्यांचा विशेष सन्मान केला. शिवाय महिला कर्मचाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांच्या सेवेला सलाम केला. जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करताना ममता बाल सदन (बालगृह) कुंभारवळण येथे महिलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा अनोखा उपक्रम पार पडला. संस्थेचे अध्यक्ष दिपक दादा गायकवाड यांनी स्वयंपाकी महिला कर्मचाऱ्यांना एक दिवसाची सुट्टी देऊन स्वतःच्या हाताने ८० मुली व २० कर्मचारी अशा एकूण १०० जणांसाठी दिवसभराचा स्वयंपाक केला.

यामध्ये सकाळचा चहा, नाश्ता, दुपारचे जेवण तसेच रात्रीचे गोड जेवण अशा सर्व भोजनाची व्यवस्था त्यांनी स्वतः केली. यावेळी महिला कर्मचाऱ्यांना गुलाबपुष्प भेट देऊन त्यांच्या सेवेला मानाचा मुजरा करण्यात आला. अनेक वर्षांपासून संस्थेत सेवा देणाऱ्या या महिलांसाठी हा उपक्रम एक आगळी-वेगळी आणि अविस्मरणीय भेट ठरली. पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक दादा गायकवाड यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मनीष बोपटे, वरिष्ठ लिपिक संजय गायकवाड, ट्रस्टी गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी, नाना कुंभारकर, रवी ओहोळ, रितेश जांभूळकर, अशोक पवार, कृष्ण यादव, सुजित कुमार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मीनल व अनामिका यांनी केले. संस्थेतील चिमुकली खुशी सिंधुताई सपकाळ हिने राजमाता जिजाऊंची भूमिका साकारली. यावेळी संस्थेतील तनिषा, खलिदा, दिक्षा, भावना, अनामिका, नेहा, अक्षता, स्वप्नाली, पावनी, साक्षी, दिव्यानी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

महिला दिनाचे औचित्य साधून संस्थेतील साफसफाई, भांडी घासणारी, स्वैपाकी पासून ते अधिक्षिका पर्यंत सर्व महिला कर्मचाऱ्यांचा गौरव गुलाब पुष्प देत गौरव करण्यात आला. यामध्ये अधीक्षिका स्मिता पानसरे, सौ. सुजाता गायकवाड, सरपंच मंजुषा गायकवाड, ज्योती सिंधुताई सपकाळ, मोनिका राजगुरू, चांदणी शिरोळकर, सिंधू गजरमल, रुख्मा वैद्य, मंदा पवार, अर्चना कड, वैशाली माने, संगीता कणसे, प्रभावती लीपने आदी महिलांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. शेवटी सर्व महिलांनी एकत्र येऊन केक कापून महिला दिनाचा आनंद साजरा करण्यात आला. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाटाने प्रतिसाद दिला.

# आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स लीग शिअरफोर्स १६ मार्चपासून

*विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर तर्फे आयोजन*

पुणे (दै. संध्या)




विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या वतीने आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स लीग शिअरफोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पोर्ट्स लीगमध्ये फुटबॉल, बास्केटबॉल आणि व्हॉलीबॉल स्पर्धा होणार आहेत. शिवाजीनगर मधील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर दिनांक १६ ते १८ मार्च दरम्यान या स्पर्धा होणार आहेत, अशी माहिती विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे सचिव जितेंद्र पितळीया आणि प्राचार्य प्रसन्न देसाई यांनी दिली.

यावेळी क्रीडा सचिव ऋषिकेश लोहाटे, कार्तिक हाडके, क्षितिजा रायबान उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन पुणे जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष ललित नहाटा यांच्या हस्ते होणार आहे. तर पारितोषिक वितरण आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू प्रियांका बोरा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

बास्केटबॉल, फुटबॉल आणि व्हॉलीबॉल या स्पर्धांमध्ये १८ ते २३ या वयोगटातील सुमारे ६०० पेक्षा अधिक विद्यार्थी खेळाडू खेळणार आहेत. यामध्ये मुलांचे आणि मुलींचे एकूण ४२ संघ सहभागी होतील. स्पर्धेचे उद्घाटन सोमवार दिनांक १६ मार्च रोजी रोजी सकाळी ८ वाजता होणार आहे आणि पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १८ मार्च रोजी ४ वाजता होणार आहे.

स्पर्धेमध्ये पुण्यातील १३ वास्तुकला महाविद्यालयातील संघाचा समावेश आहे. यामध्ये मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (एम.एम. सी. ओ. ए.), डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर, आकुर्डी (डी. वाय. पी. सी. ओ. ए.), डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, लोहेगाव (डी. वाय. पी. सी. ओ. ए.), भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (बी. एन. सी. ए.), अलाना कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (ए. सी. ओ. ए.), डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (डी. वाय. पी. सी. ओ. ए.), ब्रिक स्कूल ऑफ आर्किटेक्चर (बी. एस. ओ. ए.), आयोजन स्कूल ऑफ डीझाईन (ए. एस. ए. डी.) , भारती विद्यापीठ डीम्ड युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (बी. व्ही. डी. यू.), सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (एस. सी. ओ. ए.),एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पिंपरी चिंचवड (एस.बी.पी. सी.ओ.ए.),मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ एन्विरॉन्मेंटल डिझाईन,डी.वाय.पी.सी.ई.टी. कोल्हापूर,श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (पी. व्ही.पी. सी. ओ. ए.)आदी महाविद्यालये स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

# पतसंस्थांना ग्रामदैवत यात्रेचा विसर

नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगावातील काही पतसंस्था या फक्त व्यवसाय करण्यापुरत्या राहिलेल्या आहेत. कोणाचे वाढदिवस, पतसंस्थेच्या ठेवी, व्याज यातील माहिती तसेच व्यापारी वर्ग यांच्या व्यवसायाच्या जाहिराती या पतसंस्थांच्या कॅलेंडरवर जास्त व इतर लोकोपयोगी माहिती कमी असते. नारायणगावचे ग्रामदैवत मुक्ताई देवी जिच्या नावाने आपण दिवसाची सुरुवात करतो या मुक्ताई देवीचाच विसर या कॅलेंडरवाल्यांना पडला असून मुक्ताई देवीची यात्रा कधी आहे हे सुद्धा या पतसंस्था आपल्या कॅलेंडरवर टाकत नाहीत. ग्रामदैवत असलेल्या या देवीच्या यात्रेनिमित्त बाहेरगावाहून तसेच संपूर्ण पुणे जिल्ह्यातून हजारो ग्रामस्थ येत असतात. ही कॅलेंडर पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी व्यवसायानिमित्त गेलेल्या गाववाल्यांच्या घराघरातील भिंतीवर लावण्यात येत असतात. या गाववाल्यांना वर्षातून एकदा येणारी आपल्या गावची यात्रा कधी आहे याची उत्सुकता लागलेली असते. यात्रेचा कालावधी पाहण्यासाठी कॅलेंडरवरील तारखांचा उपयोग केला जातो. या यात्रेच्या कालावधीत नोकरदार वर्ग सुट्ट्या काढण्याचे नियोजन करत असतो . परंतु आपल्या गावची यात्रा कधी आहे. हे या नागरिकांना कॅलेंडरवर उल्लेख नसल्यामुळे कळत नाही. काही गावातल्या पतसंस्थांनी तर अहिल्यानगर येथील यात्रेचा उल्लेख केला आहे.परंतु नारायणगाव येथील ग्रामदैवत असलेल्या मुक्ताई देवीच्या यात्रेचा त्यांना विसर पडला असून यात्रेचा उल्लेखसुद्धा केलेला नाही. त्यामुळे या गावातील काही पतसंस्था कॅलेंडर म्हणजे फक्त धंदा व जाहिराती करण्याचे साधन आहे की काय असा प्रश्न भाविक भक्तांना पडला असून पुढील वर्षी येणाऱ्या कॅलेंडरमध्ये सर्व पतसंस्थांनी गावातीलच असलेल्या विक्रांत पतसंस्थेच्या कॅलेंडरप्रमाणेच आपल्या कॅलेंडरमध्ये आई मुक्ताई देवीच्या यात्रेचा उल्लेख करावा अशी मागणी भाविक भक्त व पुणे जिल्ह्यात कामानिमित्त गेलेल्या गावकऱ्यांनी केली आहे.

# पुण्याच्या कसबा पेठेतील ४० वर्षीय युवक बेपत्ता

कवठे येमाई (दै. संध्या)

पुण्याच्या कसबा पेठ परिसरातील स्वप्नील सुरेश समेळ (वय ४० वर्षे) हे युवक गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता झाले असून याबाबत फरासखाना पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास स्वप्नील समेळ हे कसबा पेठ, तांबट हौद, पुणे – ११ येथील राहत्या घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर ते अद्यापपर्यंत घरी परतले नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र कोणताही ठावठिकाणा लागला नसल्याने अखेर फरासखाना पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

स्वप्नील समेळ यांचा रंग गोरा, चेहरा उभट, उंची सुमारे ५ फूट ८ इंच असून ते घरातून बाहेर पडताना पांढऱ्या रंगाचा चेक्सचा शर्ट व डार्क चॉकलेटी रंगाची पँट परिधान केलेली होती. त्यांच्या हातावर मोबाईल क्रमांक गोंदवलेला असल्याची विशेष ओळख आहे. ते मराठी भाषा बोलतात अशी माहितीही तक्रारीत नमूद करण्यात आली आहे.

या प्रकरणी कुटुंबीयांकडून शोध सुरू असून कोणाला स्वप्नील समेळ थोडेफार वाकून चालणारे गृहस्थ यांच्याबाबत काही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांशी किंवा कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिबीरामध्ये ५७५ दाखल्याचे वितरण : वैभव नावडकर

बारामती (दै. संध्या)




महसूल विभागाच्यावतीने काटेवाडी येथे शनिवारी (७ मार्च) रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरामध्ये नागरिकांना २६७ संगणकीकृत सातबारा २६७, ८-अ उतारा २५१, विविध विभागाकडील दाखले २३७ असे एकूण ५७५ दाखले वितरित करण्यात आले आहे, कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, अशी माहिती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली. यावेळी तहसीलदार स्वप्निल रावडे, निवासी नायब तहसीलदार नामदेव काळे, महसूल नायब तहसीलदार स्वाती गायकवाड, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक संजय धोंगडे, पुरवठा निरीक्षण अधिकारी तितिक्षा बारापत्रे, काटेवाडीच्या सरपंच मंदाकिनी भिसे, उपसरपंच मिलिंद काटे, मंडळ अधिकारी राजेंद्र गिरमे, काटेवाडी मंडळातील ग्राम महसूल अधिकारी, आधार कार्ड केंद्रचालक, सीएससी, महा-ईसेवा केंद्रचालक, गॅस पुरवठादार आदी उपस्थित होते.

श्री. नावडकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरामध्ये नागरिकांना भेडवासणाऱ्या विविध समस्यांची सोडवणूक करण्यात येईल, येत्या १४ मार्च रोजी शिर्सुफळ येथे शिबीराचे आयोजन करण्यात येणार असून अधिकाधिक नागरिकांनी या शिबीरात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. नावडकर यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजनाबाबत माहिती देतांना श्री. रावडे म्हणाले, महसूल विभागातील प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ७/१२ अभिलेख दुरुस्ती, अकृषक तरतुदी सुधारणा, कमी जास्त पत्रके तयार करणे, पाणंद रस्ते, ई-मोजणी अर्ज, जिवंत ७/१२ टप्पा २ अंतर्गतच्या नोंदीबाबत मार्गदर्शन केले. विविध विभागाच्या योजना व सेवांविषयी मार्गदर्शन केले.

शिबीरात निकाली फेरफार ४३ करण्यासोबतच ७/१२ मधील दुरुस्तीसंदर्भात ५७ अर्ज प्राप्त झाले, एक खिडकी योजनेअंतर्गत ४१ अर्ज निकाली तसेच अकृषक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर २ प्रकरणे अद्यावत करण्यात आले. महसूल, भूमी अभिलेख, पुरवठा, ग्रामविकास, आरोग्य, सामाजिक न्याय, कृषी विभाग, टपाल कार्यालय आदी विभागांच्या सेवांच्या लाभ देण्यात आला. श्री. नावडकर आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध विभागामार्फत देण्यात आलेल्या लाभाचे वाटप करण्यात आले.

# पिंगोरी येथे खाजगी माळरान व डोंगराला वणवा

## ड्रिप पाईपलाईन जळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



> “आमच्या भागात मोठे वनक्षेत्र आहे; मात्र वनाला आग लागल्यानंतर ती तातडीने कशी विझवायची यासाठी ग्रामपंचायतीकडे कोणतीही यंत्रणा नाही. वनविभागाकडूनही प्रशिक्षण किंवा जनजागृती होत नाही. त्यामुळे प्रत्येक गावात आग विझवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याची गरज आहे.”
> — **संदीप यादव, सरपंच, पिंगोरी**

> “आपल्याकडे लोक वनसंरक्षणासाठी फारसे उत्सुक नाहीत. अनेकदा शेताचा बांध स्वच्छ करण्यासाठी अनियंत्रित आग लावली जाते आणि त्यातून मोठे वणवे लागतात. यामुळे जंगलाचे मोठे नुकसान होते. प्राणी आगीत मरतात आणि जनावरांचा चारा नष्ट होतो. त्यामुळे बांधावर आग लावताना पुरेशी खबरदारी घ्यावी; अन्यथा अशा प्रकारांवर वन विभाग कारवाई करू शकतो.”
> — **राहुल शिंदे, पोलिस पाटील, पिंगोरी**

वाल्हे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील पिंगोरी परिसरात खाजगी माळरान व डोंगराला लागलेल्या वणव्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. स्थानिक तरुणांनी धाडसाने आग आटोक्यात आणली; मात्र तोपर्यंत माळरानावरील ड्रिप इरिगेशन पाईपलाईनसह मोठ्या प्रमाणात गवत जळून खाक झाले. पिंगोरी येथील खाजगी माळरानावर शेतकऱ्यांनी झाडांची लागवड केली होती. या झाडांना पाणी देण्यासाठी सुमारे पाच एकर क्षेत्रावर ड्रिप इरिगेशनची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र अचानक लागलेल्या वणव्यामुळे या ड्रिपच्या पाईपलाईन पूर्णपणे जळून नष्ट झाल्या. त्याचबरोबर जनावरांच्या चारासाठी असलेले मोठ्या प्रमाणातील गवतही आगीच्या भक्षस्थानी पडले. पुरंदर तालुक्यात सध्या विविध भागांत वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. काही वेळा शेतकरी शेताच्या बांधाची स्वच्छता करण्यासाठी आग लावतात; परंतु ती आग नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर डोंगर व माळरानावर पसरून मोठ्या वणव्याचे रूप धारण करते. पिंगोरी,जेजुरी, दौंडज, साकुर्डे, परिंचे, वाल्हे,गुळूंचे, राख, कर्नलवाडी परिसरात अशा घटनांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. या भागात हरिण, ससा तसेच विविध प्रकारचे पक्षी मोठ्या प्रमाणावर आढळतात. वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे वन्यजीवांचे अधिवास धोक्यात येत असून त्यांच्या अन्नसाठ्याचाही मोठा नाश होत आहे. तसेच अनेक लहान औषधी वनस्पतीही आगीत नष्ट होत आहेत. दरम्यान, रविवारी सायंकाळी पिंगोरी परिसरातील यादववस्ती भागात लागलेल्या या आगीवर स्थानिक तरुणांनी मोठ्या प्रयत्नाने नियंत्रण मिळवले. यामध्ये रुपेश यादव, अनिकेत यादव, विशाल यादव, आदित्य यादव, मयूर यादव, स्वप्निल यादव, दत्ताराम यादव, कृष्णा यादव, राजेंद्र गायकवाड, नवनाथ यादव, हनुमंत यादव तसेच पिंगोरीचे पोलिस पाटील राहुल शिंदे यांनी सक्रिय सहभाग घेतला. पुरंदर तालुक्याला विस्तीर्ण डोंगराळ वनक्षेत्र लाभले आहे. या जंगलांमध्ये विविध औषधी वनस्पती व वन्यजीव आढळतात. मात्र आगीपासून संरक्षणासाठी प्रभावी यंत्रणा नसल्याने दरवर्षी हजारो एकर क्षेत्र जळून नष्ट होत असल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली. ग्रामसुरक्षा दलाप्रमाणे प्रत्येक गावात ‘वनसुरक्षा दल’ स्थापन करून आग विझवण्यासाठी आवश्यक साधनसामग्री व प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याची मागणीही स्थानिकांकडून केली जात आहे. सध्या वन समित्या केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात तरुणांना त्यामध्ये सहभागी करून घेतले जात नसल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.